स्वादमय सेवेचा • राजस्थानी थाळी •
स्वादिष्ट.. रुचकर
भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर फोन: 2327060, 9850799850

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
आता चष्मा घालवा कायमचा
चष्मा नको?
कॉन्ट्यूरा व्हिजन • मोतिबिंदू • काचबिंदू • नेत्ररोपण
डॉ. कांकरियांचे
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
नांवनोंदणी आवश्यक
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Email : saisuryaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
Help line 9112288611 Appointment 8888982222

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. २४.०५.२०२४ | अंक नं. ०७१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

# शहरात विजेचा ‘खेळखंडोबा’ सुरुच, उकाड्याने नागरिक झालेत ‘घामाघूम’

## वीजपुरवठ्यात सुधारणा करा अन्यथा महावितरण कार्यालयात ‘आमरण’ उपोषणास बसणार, आगरकर मळ्यातील संतप्त नागरिकांचा इशारा

नगर – सध्याचे उच्चांकी तापमान आणि उकाडा यामुळे नागरिक हैराण झालेले असतानाच विजेचाही खेळखंडोबा सुरू झाला आहे. शहरातील अनेक भागात विजेचा लपंडाव सुरू असून, काही भागात अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने नागरिक ‘घामाघूम’ झाले आहेत. विद्युत पुरवठ्यात सुधारणा करण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा देऊनही ‘महावितरण’चे अधिकारी, कर्मचारी त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. विज पुरवठा तातडीने सुरळीत न केल्यास ‘महावितरण’च्या अधीक्षक अभियंत्याच्या दालनात ‘आमरण’ उपोषणाला बसण्याचा इशारा जागरुक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहास मुळे यांच्यासह नागरिकांनी दिला आहे.

या संदर्भात मंचाचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी शुक्रवारी (दि.२४) महावितरण कार्यालयात जाऊन अभियंता पवन बाविस्कर यांना निवेदन देऊन विजेचा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. येत्या २४ ते ४८ तासात विजेचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे. मात्र आश्वासनाप्रमाणे काम सुरू न झाल्यास उपोषण, आंदोलन करण्यात येईल, असे मुळे यांनी सांगितले. यावेळी अरुण आवारी, बाळासाहेब गांधी, गोरक्षनाथ गिते, विकास मुळे, गिरीश गुगळे, श्रीधर नांगरे, अभय कोठारी, सिद्धार्थ पाटील आदी उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील आगरकर मळा, रेल्वे स्टेशन रोड, स्मृती हाऊसिंग सोसायटी, एमएसईबी कॉलनी, बेलेश्वर कॉलनी, गायके मळा, रविश हाऊसिंग, आनंदनगर, रेल्वे स्टेशन परिसरातील नागरिक मागील दोन महिन्यांपासून विजेच्या खेळखंडोबामुळे हैराण झालेले असून, मागील महिन्यामध्ये १५ एप्रिल रोजी मेल पाठवून सर्व परिस्थितीची कल्पना दिलेली होती, तरी देखील महावितरण अधिकाऱ्यांकडून याची कोणतीही दखल घेतली नाही.

आगरकर मळा परिसरामध्ये २०० च्या पुढे व्होल्टेज जात नाही. दररोज १६०–१७० व्होल्टेजने विद्युत पुरवठा होत असल्यामुळे धडाधड उपकरणे बंद पडणे, या उकाड्याच्या



विजपुरवठा तातडीने सुरळीत करण्याच्या मागणीचे निवेदन विद्युत विभागाचे अभियंता पवन बाविस्कर यांना देताना अध्यक्ष सुहास मुळे, अरुण आवारी, बाळासाहेब गांधी, गोरक्षनाथ गीते, विकास मुळे, गिरीश गुगळे, श्रीधर नांगरे, अभय कोठारी, सिद्धार्थ पाटील, आदी. (छाया– लहू दळवी)

दिवसांमध्ये ५ वर लावलेला फॅन १ वर असल्यासारखा हळु फिरणे, फ्रिज बंद पडणे, लो होल्टेजमुळे दर ५ मिनिटांनी एसी बंद पडणे, पाण्याच्या मोटारी बिघडणे असे गंभीर प्रकार सुरू झालेले असून, महावितरणचे अधिकारी व कर्मचारी श्री. काकडे, श्री. बाविस्कर यांच्याशी वारंवार फोनवर संपर्क साधूनही आपल्या आगरकर मळा परिसरामध्ये दोन कंडक्टरची गरज आहे, ते उपलब्ध नसल्यामुळे अतिशय कमी दाबाने विद्युत पुरवठा होतो आहे. यासाठी आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविले असून ते दखल घेत नाहीत, आम्ही काही करू शकत नाही, असे नेहमीच उत्तर दिले जाते तसेच वरून बिघाड झाला आहे, वर कळवलेले आहे. हे वर कळवलेले असते, म्हणजे कुठे, वर ब्रह्मदेवाला कळवलेले असते का? याची दखल का घेतली जात नाही? असा सवालही करण्यात आला आहे.

दरवर्षी न चुकता भाडेवाढ करणारी महावितरण कंपनी, नागरिकांना योग्य दाबाने वीज पुरवठा करू शकत नसेल आणि कष्टाने घामाने कमावलेल्या पैशातून घेतलेल्या उपकरणांचा बिघाड होत असेल तर आता आपल्या दालनामध्ये बसून ‘आमरण’ उपोषण करण्याव्यतिरिक्त दुसरा पर्याय राहिलेला नाही. त्यामुळे आपल्याला सदरची अंतिम सूचना देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री, ज्यांच्याकडे ऊर्जा खाते आहे व त्यांचे कार्यक्षम असे ५–६ सचिव यांनादेखील सदरची अंतिम सूचना मेलवर पाठवण्यात आली आहे. उच्च न्यायालयामध्ये देखील सदर पत्राची प्रत मेलवर सादर करण्यात आली आहे.

येत्या आठवडाभरामध्ये व्होल्टेजचा दाब सुधारला नाही तर सर्वजण आपल्या दालनामध्ये येऊन आमरण उपोषणाला बसू असे या नोटीसीद्वारे कळवण्यात आले आहे.

आमच्या घरातील उपकरणे धडाधड बंद पडून जळू लागले आहेत, त्याची सर्व नुकसान भरपाई आपल्या अधिकाऱ्यांकडून वसुल करण्यासाठी उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागले तरी हरकत नाही, कारण याबाबत आपले दुर्लक्ष आणि दिरंगाई हेच कारणीभूत ठरत आहे.

या परिसरात अनेक वेल्डिंगची दुकाने व डेअरी, डीप फ्रीज धारक असून, थेट मीटर मध्ये किंवा आकडे टाकून वीज चोरी करून कामे चालू असतात. त्यांच्याकडे कर्मचारी अर्थपूर्ण दुर्लक्ष करतात कारण त्यांना त्यामधून नियमित प्राप्ती होत असते.

पावसाळा तोंडावर आलेला आहे. त्यावेळी पुन्हा पावसाचे कारण सांगून कामाची टाळाटाळच केली जाणार आहे. तेव्हा या नोटीसीची गंभीर दखल घेऊन तत्काळ या परिसराला दोन कंडक्टर उपलब्ध करून द्यावेत आणि महावितरण कंपनीला पैशांची भीक लागलेली असेल तर सर्व नागरिक वर्गणी करून दोन कंडक्टरचे पैसे तुम्हाला देऊ. कारण आमची कष्टाने कमावलेली हजारो, लाखो रुपयांची उपकरणे वाचवायची आहेत. एक महिन्यापासून जीव मुठीत धरून हा सगळा खेळखंडोबा सहन करत आहोत. तत्काळ हे कंडक्टर बसवून येथील विद्युत दाब २२० व्होल्ट नियंत्रित करावा अन्यथा ३ जूनपासून आपल्या दालनात येऊन आमरण उपोषणाला बसणार आहोत, असे सुहास मुळे यांनी म्हटले आहे.

SONi TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Career Ki Shuruwat DiSHA ke saath
DiSHA COMPUTER INSTITUTE
JOIN TODAY
MAHA DiSCOUNT offer
Just in 1800 Any Course
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME
PHOTOSHOP, CORELDRAW, ILLUSTRATOR
INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
30 ते 70% डिस्काउंट सेल
आला रे आला राजपाल सेल आला..!
मार्ट असो वा स्मार्ट...मिल असो वा मॉल
सर्वात स्वस्त देणार राजपाल!
myTRIDENT
₹10,000/- खरेदीवर ₹1199/- किमतीचे
लक्झरी टॉवेल सेट फ्री
संगमनेर (02425) 222226
अ.नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## कर्णपत्नी बहिष्कृताची राणी

पत्रकार, मास कम्युनिकेशनच्या पदवीधारक व इंग्रजी साहित्यकार कविता काणे यांच्या या पुस्तकाचे अनुवाद शुचिता फडके यांनी केलाय.

उरूवी ही पुकेय देशाची राजकन्या. हस्तीनापूरच्या स्पर्धेच्या आराखड्यात तिने कर्णाला पाहिलं. पाहताक्षणीच ती त्याच्या प्रेमात पडली. तो तिच्या ध्यानीमनी बसला. तिचा ध्यास बनला कर्ण.

क्षत्रिय कुळात जन्मलेल्या उरूवीने सामाजिक संकेत नाकारत, उच्चकुलीन धनुर्धर अर्जुनाला डावलत स्वयंवरात कर्णाला वरते ती होते कर्णपत्नी! कर्णाची द्वितीय पत्नी!

ही कहाणी आहे, महाभारताच्या विशाल पटावर उमटलेल्या कर्ण व उरूवीच्या

वाचनीय मननीय

प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

उत्कट प्रीतीची...

कर्णाच्या जन्मजात वेदनांवर फुंकर घालणाऱ्या आणि कर्णाचे भागधेय खंबीरपणे स्वीकारणाऱ्या कर्णपत्नीची... एका बहिष्कृत राणीची... आणि तिच्या नजरेतून कौरव–पांडव संघर्षाची... महाभारत युद्धाची सुद्धा!



खरं तर हे पुस्तक प्रत्येकालाच वाचण्यासारखे पण आजच्या स्वातंत्र्यात राहणाऱ्या, स्वावलंबी मुली, महिलांनीही अवश्य वाचायला हवे. समाजविरोध असतांनाही स्वतःचे निर्णय, प्रेम, जबाबदाऱ्या याचे भान मिळेल. आपल्या अस्तित्वासह जगण्याचा मान मिळेल.





आर्किटेक्टस्, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो अहमदनगर आणि पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे सभासद आणि नगरवासियांसाठी ऐतिहासीक वस्तू संग्रहालय आणि संशोधन केंद्र येथे भेटीप्रसंगी आयोजित व्याख्यानप्रसंगी दीपप्रज्वलन करताना भूषण देशमुख. (छाया – लहू दळवी)

# जुन्या वास्तू जतन केल्यास अहमदनगर शहराला देशातील मुख्य पर्यटन स्थळाचा दर्जा मिळू शकतो

### भूषण देशमुख यांचे प्रतिपादन; आर्किटेक्टस्, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो. वतीने ऐतिहासिक वस्तू संग्रहालय येथे भेटीचे आयोजन

नगर – अहमदनगर शहराला पाचशे पेक्षा जास्त वर्षांचा इतिहास असून स्थापना दिनाची तारीख माहिती असलेल्या मोजक्या शहरात आपली गणना होत आहे. आपल्या शहराचे नाव शेकडो वर्षांपूर्वी जगातील व्यापारात आणि वास्तू वैभव असलेल्या शहरांमध्ये अग्रस्थानी होते. निजामशाहीच्या काळात शहरात भव्य वास्तू वैभव आपल्या शहराला लाभले. यामध्ये त्या काळात केलेली शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी असलेली खापरी नळ योजना याचे उत्तम उदाहरण असून अजूनही त्याचे अवशेष आपल्याला खोदकामात आढळून येतात. भुईकोट किल्ल्याची भक्कम तटबंदी, नैसर्गिक दृष्ट्या जागेची निवड आणि अभेद्य असे बांधकाम या स्थापत्य कलेचा अनोखा नमुना आहे. यामध्ये झुलता पूल, प्रवेश द्वार, सर्व बाजूने संरक्षणासाठी पाणी सोडण्याची व्यवस्था उल्लेखनीय असल्याचे इतिहासाचे अभ्यासक भूषण देशमुख यांनी नमूद केले आहे. त्याचबरोबर बागरोजा, दमडी मस्जिद, सलाबत खानाची कबर, फराह बक्ष महल, कोठला, मांजरसुंबा, कोतवाली जुनी इमारत आणि घुमट, मुलुख मैदान तोफ, दिल्लीगेट व माळीवाडा वेश, ह्युम चर्च, मेहेर बाबा येथील विविध बांधकामे अश्या वास्तूचे उत्कृष्ट नमुने असलेल्या इमारती शेकडो वर्षापासून शहराच्या वैभवात भर घालत आहेत. यात प्रामुख्याने काळा पाषाण दगडाचा वापर केलेला दिसून येतो. हा ऐतिहासीक वारसा योग्य प्रकारे जतन केल्यास आणि यास प्रसिध्दी दिल्यास जगभरातून पर्यटक तो पाहण्यास आपल्या शहरात येतील. शहरात आमूलाग्र बदल करण्यास आणि पर्यटनास वाव देण्यास नक्कीच यांचा उपयोग स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे असे भूषण देशमुख यांनी म्हटले आहे.

एसा सभासद आणि नगर वासियांसाठी शहराच्या स्थापना दिनाच्या पूर्वसंध्येला ऐतिहासिक वस्तू संग्रहालय आणि संशोधन केंद्र येथे भेट प्रसंगी ते बोलत होते.

आर्किटेक्टस्, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो अहमदनगर आणि पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे सभासद आणि नगरवासियांसाठी ऐतिहासीक वस्तू संग्रहालय आणि संशोधन केंद्र येथे भेटीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अहमदनगर इतिहास प्रेमी भूषण देशमुख यांचे अहमदनगरमधील जुने वास्तू वैभव आणि काळानुरुप त्याची जडणघडण या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. नविन पिढीतील युवकांना तसेच नागरिकांना आपल्या शहराचा इतिहास माहिती व्हावा या उद्देशाने एसाने पोलाद स्टील जालना यांच्या सहकार्याने या भेटीचे आयोजन केले होते. हजारो वर्षांपूर्वीच्या शहरातील जतन करून ठेवलेल्या वस्तूंची संग्रहालयात भेट देऊन माहिती या निमीत्ताने उपस्थितांना झाली.

डॉ. रवींद्र साताळकर आणि विश्वस्त मंडळ यांच्या प्रयत्नांमुळे मागे या वस्तू संग्रहालयाचे नूतनीकरण करण्यात आले. डॉ संतोष यादव व संचालक चांगल्या प्रकारे त्या वस्तूंचे जतन करून नगरचा इतिहास भेट घेणाऱ्या नागरिकांना सांगत आहेत.

संस्था सचिव प्रदिप तांदळे यांनी संस्था समाज प्रबोधन आणि नवीन पिढीला शहराचा इतिहास माहिती होण्यासाठी असे उपक्रम राबवत असल्याचे सांगितले.

पोलाद स्टील कंपनीचे आशिष भाबडा, यश दायमा, सुशांत गव्हाणे आणि आदेश गूंगे यांचे सहकार्य हा उपक्रम करण्यास लाभले.

या उपक्रमास संस्था अध्यक्ष रमेश कार्ले, सुनिल औटी, प्रितेश पाटोळे, संजय दळवी, सुरेंद्र धर्माधिकारी, संजय चांडवले, अजय दगडे, इक्बाल सय्यद, अनिल मुरकुटे, रत्नाकर कुलकर्णी, मीनल काळे, एन. डी. कुलकर्णी, विशारद पेटकर, स्वरूपा शहापूरकर, किरण टकले यांच्यासह सभासद, कुटुंबीय आणि नगरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यश शहा यांनी केले तर संचालक अन्वर शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पोलिसांत तक्रार दिल्याच्या रागातून एकाला विषारी औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न

नगर – पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याच्या रागातून तिघांनी एकाला बळजबरीने विषारी औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना नगर तालुक्यातील वाळकी गावात घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलिसांनी तिघांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत खंडू सीताराम भालसिंग (वय ५०, रा. वाळकी, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी खंडू भालसिंग हे दिव्यांग असून त्यांचे व शंकर सीताराम भालसिंग यांचे रविवारी (दि.१९) दुपारी वाद झाले होते. त्यामुळे त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली होती. याचा राग मनात धरून शंकर सीताराम भालसिंग त्याचा मुलगा नितीन शंकर भालसिंग व पत्नी मीना शंकर भालसिंग यांनी रात्री ९.३० च्या सुमारास फिर्यादीच्या घरी जाऊन मोठमोठ्याने शिवीगाळ केली.

तसेच तु आमच्यावर केसेस करतो काय, दुपारी तुला कमी मारले पण आता जीवे ठार मारतो असे म्हणत शंकर आणि नितीन या दोघांनी त्यांना पकडले. त्यांनी खिशात आणलेली विषारी औषधाची बाटली काढून बळजबरीने औषध फिर्यादीच्या तोंडात ओतले. यावेळी घरात असलेली फिर्यादीची पत्नी सुनिता ही त्यांना वाचविण्यासाठी धावली असता मीना भालसिंग हिने तिला मध्येच पकडत मारहाण केली व तेथेच दाबून धरले.

फिर्यादीला विषारी औषध पाजून ते तिघे शिवीगाळ करत निघून गेले. फिर्यादीच्या पोटात विषारी औषध गेल्याने त्यांना त्रास होवू लागला. त्यामुळे त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार घेतल्यावर त्यांनी गुरुवारी (दि.२४) नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ३०७, ४५२, ३२३, ५०४, ३४ सह अपंग अधिनियम कलम ९२ अ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# सावेडी उपनगरात युवकावर कोयता व रॉडने जीवघेणा हल्ला

नगर – मागील भांडणाचा राग मनात धरून युवकावर कोयता व रॉडने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना बुधवारी (दि.२२) दुपारी सावेडी उपनगरातील पाईपलाईन रस्त्यावरील सुखकर्ता कॉर्नरवर घडली. करण अशोक दाहिजे (वय २० रा. गावडे मळा, पाईपलाईन रस्ता, सावेडी) असे जखमी युवकाचे नाव आहे. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी उपचारादरम्यान पोलिसांना दिलेल्या जबाबावरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करण बुधवारी दुपारी भिस्तबाग येथून ड्रायक्लीनचे कपडे घेऊन दुचाकीवरून पाईपलाईन रस्त्याने जात असताना दुपारी एकच्या सुमारास सुखकर्ता कॉर्नरजवळ त्यांना तीन दुचाकीवरून आलेल्या व्यक्तींनी अडवले. करण तनपुरे याच्या हातात कोयता, सातव व अर्जुन तनपुरे यांच्या हातात लोखंडी रॉड व दोन ते तीन अनोळखी व्यक्तींकडे लाकडी दांडके होते. त्यांनी करणला मारहाण करून जखमी केले. भांडण सुरू असताना रस्त्यावरील लोक जमा झाल्याने मारहाण करणारे घटनास्थळावरून पसार झाले.

दरम्यान दोन ते तीन दिवसांपूर्वी यश सातव याने दारू पिऊन सायंकाळी साडेआठच्या सुमारास करणला शिवीगाळ केली होती. यासंदर्भात करण यांनी यशच्या आई – वडिलाला सांगितले असता त्याच्यावर पोलिसांत खोटी तक्रार दाखल केली होती. मुलाबाबत सांगितल्याचा राग मनात धरून करणला मारहाण करण्यात आली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# सारसनगरमध्ये दोन महिलांसह तिघांना भररस्त्यात तलवारीचा धाक दाखवून लुटले

### सराईत गुन्हेगार मडक्या टोळीचा धुमाकूळ; पोलिस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल

नगर – सराईत गुन्हेगार शुभम उर्फ मडक्या धुमाळ व त्याच्या साथीदारांनी सारसनगर परिसरात चांगलाच धुमाकूळ घातला आहे. रस्त्याने जाणाऱ्या दोन महिलांसह तिघांना अडवून रॉड, दांडके व तलवारीने मारहाण करून त्यांच्याकडील १३ ग्रॅमचे सोन्याचे मिनी गंठण काढून घेतले. बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास सारसनगरच्या त्रिमुर्ती चौकात ही घटना घडली.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात लुटमार करणाऱ्या सहा जणांविरूध्द दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुजाता सचिन हिंगे (वय ३९, मुळ रा. शिराढोण ता. नगर, हल्ली रा. त्रिमुर्ती चौक, सारसनगर) यांनी फिर्याद दिली आहे. मारहाणीत त्यांच्यासह त्यांची बहिण मनिषा कासार व मेव्हणा अर्जुन कासार जखमी झाले आहेत. बुधवारी सायंकाळी फिर्यादी व इतर दोघे दुचाकीवरून जात असताना सारसनगरमधील छबु कांडेकर यांच्या फॅब्रिकेशन दुकानाजवळ दोन दुचाकीवरून आलेल्या सहा जणांनी त्यांना अडवले. 'आमच्याकडे मागे वळून काय बघता' असे म्हणून फिर्यादीच्या गळ्यातील १३ ग्रॅमचे मिनी गंठण बळजबरीने हिसकावून घेतले. फिर्यादीसह त्यांची बहिण व मेव्हण्यास शिवीगाळ, दमदाटी करून लाथाबुक्क्यांनी, दांडके, रॉड व तलवारीने मारहाण करून दरोडा टाकला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी ऋषिकेश अशोक बडे (रा. भगवान बाबा चौक, सारसनगर) शुभम उर्फ मडक्या मारुती धुमाळ, निलेश उर्फ काळ्या मारुती जायभाय, अविनाश विश्वास जायभाय, अजित केकाण, प्रतिक उर्फ बाबू अर्जुन गर्जे (सर्व रा.सारसनगर) यांच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ३९५ सह आर्म अ‍ॅक्ट ४/२५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. यातील अविनाश विश्वास जायभाय व प्रतिक उर्फ बाबू अर्जुन गर्जे या दोघांना गुरुवारी (दि.२३) सायंकाळी पकडण्यात आले असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंके करत आहेत.

# मान्सूनपूर्व देखभाल दुरुस्तीच्या कामामुळे शहरासह उपनगरांना १ दिवस विलंबाने पाणी

नगर – महावितरण कंपनीला मान्सूनपूर्व देखभाल व दुरूस्तीचे काम करण्यासाठी ३३ के.व्ही मुळा डॅम विद्युत वाहिनीवर २५ मे रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शट डाउन घेण्यात येणार आहे. तसेच सदर शट डाउन वेळेत अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणीपुरवठा योजनेवरील महत्वाच्या दुरूस्तीची कामे घेण्यांत येणार आहे.

दरम्यानच्या काळात मुळानगर, विळद, येथुन होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार असल्याने शहर पाणी वितरणासाठीच्या टाक्या भरता येणार नाही. त्यामुळे २५ मे रोजी बोल्हेगाव, नागापुर, सावेडी, उपनगरातील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर तसेच सारसनगर, बुरूडगाव रोड, केडगाव, नगर–कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर इ. भागास सकाळी ११.०० नंतरच्या पाणी वाटपाच्या भागास पाणी पुरवठा होऊ शकणार नाही. सदरचा पाणीपुरवठा हा २६ मे रोजी करण्यात येईल.

तसेच २६ मे रोजी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्र खुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळु बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी, या भागात व गुलमोहर रोड, प्राफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही सेंटर परिसर, म्यूनिसिपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर इ. भागात महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार नाही, या भागातील पाणी पुरवठा हा २७ मे रोजी करण्यात येईल.

२७ मे रोजी पाणी पुरवठा होऊ घातलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळेरोड, आंनदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने मनपा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर व सावेडी इ. भागात पाणीपुरवठा होणार नसून तो २८ मे रोजी करण्यात येईल.

शहरातील पाणीपुरवठा एक दिवस बंद करून उपनगरात ज्या भागात जास्त दिवसाचे रोटेशन आलेले अशा भागात पाणीपुरवठा करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. तरी नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रत्येक चतुर्थीला नगरमध्ये आरोग्य तपासणी शिबीर

नगर – निरोगी आरोग्यसेवेसाठी वचनबद्ध आम्ही हे व्हीजन समोर ठेऊन पटवेकर डायग्नोस्टीक व लुपीन डायग्नोस्टीक यांच्या संयुक्त विद्यमाने चतुर्थी हेल्थ कॅम्प आयोजित केला जात आहे. या श्री विशाल गणपती, माळीवाडा येथे प्रत्येक चतुर्थीला या शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून, पुढील काळात सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांचे मार्गदर्शनही मिळणार नाही. यात ज्या स्पेशालिटी नगर शहरात नाही त्यांची ओपीडी सेवा अगदी किमतीत मिळणार आहे.

या शिबिरात एकूण १५ टेस्ट होणार असून त्याही अगदी कमी किंमतीत आणि उच्च दर्जाचे एनएबीएल नामांकन असणाऱ्या नगरमधील एकमेव लॅबच्या माध्यमातून. तरी या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी ९२७२४९९००८ या नंबरवर संपर्क साधावा.



अयप्पा मंदिराचा प्रतिस्थापना वार्षिक महोत्सवास प्रारंभ झाला असून, महाप्रसादाचा लाभ घेताना भाविक.

### तलाठी संघाचे सचिव

## नानासाहेब वायकर यांचे हृदयविकाराने निधन

नगर – सोनेवाडी रोडवरील मेहेकरी फाटा येथील रहिवासी नानासाहेब काशीनाथ वायकर (वय ७०) यांचे २४ मे रोजी सकाळी ८.३० वा. हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर सोनेवाडी येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. ते तलाठी संघ माऊली संकुल सभागृह, नगरचे सचिव होते.



अ‍ॅड. सुचिता वायकर–बाबर, कामरगावचे माजी सरपंच सिमा साठे, विनायक व अतुल वायकर यांचे ते वडील होत.

त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# अय्यप्पा मंदिराचा प्रतीस्थापना वार्षिकोत्सवास प्रारंभ

नगर – सावेडीतील श्री आयप्पा मंदिराचा तीन दिवसीय ३० वा प्रतीस्थापना महोत्सवास (वर्धापनदिन) प्रारंभ झाला आहे. यानिमित विविध कार्यक्रम होत आहे, अशी माहिती अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली

अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे, यास २९ वर्षे पूर्ण झाली असून वार्षिक वर्धापन दिनानिमीत पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रम सुरु झाले महागणपतीहोम, अभिषेक, प्रसन्ना पूजा व लक्षाचर्न होणार आहे तर कलशपूजा अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वती देवीची पूजा, संध्याकाळी गणपती पूजा, आचार्य वरणम्, प्रसाद शुद्धी क्रिया, अस्त्र कलश पूजा, रक्षोघ्न होमम, वास्तु होमम, कलशम, वास्तुबाली, अथजा पूजा विधी झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी महागणपती होमम्, महा मृतुंजय होमम्, चथु शुधी, धारा, पंचकम, अनुज्य कलशम्, उंच पूजा विधी तर संध्याकाळी द्रव्य कलश पूजा, आदिवासी होमम् अथजा पूजा झाली.

यावेळी महाप्रसाद झाला.

# रामराव आदिक पब्लिक स्कूलचा १२ वी परिक्षेचा १०० टक्के निकाल

श्रीरामपूर – अशोकनगर येथील रामराव आदिक पब्लिक स्कूलचा बारावीचा निकाल शंभर टक्के लागला. या परीक्षेत मुठे वैष्णवी आप्पासाहेब हिने ८१.३३ टक्के मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. इनामदार माहीन युसुफ हिने ७४ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला तर उंडे मयुरेश मंगेश याने ७३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली. या विद्यार्थ्यांना समन्वयक प्रसाद मुंडलिक व शिक्षक ऋतुजा गोरे, रेणूका लांडे, गितांजली ताके, श्रद्धा पटारे, तेजस्वीनी भोसले, चंचल परदेशी व स्नेहल गवळी यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्याध्यक्ष अविनाश आदिक व विश्वस्त अनुराधाताई आदिक यांनी अभिनंदन केले.



**मंदीर परिसर फुलांनी सजविण्यात येत आहे**

श्री आयप्पा मंदिराचा प्रतीस्थापना महोत्सवानिमित्त (वर्धापनदिन) मंदीर परिसर फुलांनी सजविण्यात येत आहे त्यानिमित्त महिला सजावटीसाठी फुलांच्या माळा तयार करत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### माईग्रेनची लक्षणे

तणाव, अनिद्रा आणि झोप पूर्ण न होणे, हार्मोन स्तरात परिवर्तन, वातावरणात किंवा प्रवासात परिवर्तन, वेदनाशामक औषधांचा अतिरिक्त वापर इत्यादी माईग्रेनची लक्षणे आढळून येतात. त्याचप्रमाणे पित्ताचा त्रास होणे हे देखील एक लक्षण आहे.

## पाककला

### बटाटा रुमाली वड्या

**साहित्य** – ४ उकडलेले बटाटे, अर्धा चमचा आले-लसूण पेस्ट, १ टी स्पून धणे-जिरे पूड, अर्धी वाटी खोवलेले आले खोबरे, कोथिंबीर बारीक चिरून, लिंबाचा रस दोन चमचे, चवीप्रमाणे मीठ, २ टेबलस्पून तेलाची फोडणी, २ चमचे डाळीचे पीठ, ३ ब्रेडच्या स्लाईस, तीळ, अर्धा चमचा मिरची पेस्ट.

**कृती** – उकडलेले बटाटे जाड किसणीने किसावेत. किसात हळद, डाळीचे पीठ व कडा कापलेला ब्रेड थोड्या पाण्यात बुडवून घट्ट पिळून किसात मिसळावा. आले मिरची-लसूण पेस्ट, धने-जिऱ्याची पूड, चवीप्रमाणे मीठ व लिंबाचा रस घालून बटाट्याचे मिश्रण चांगले मळून घ्यावे. ओला रुमाल करून ताटात पसरावा. त्यावर बटाट्याचे मिश्रण पातळ थापावे. थापलेल्या मिश्रणावर खोबरे व कोथिंबीर पसरून रुमालाच्या सहाय्याने घट्ट गुंडाळी करून रोल करावेत. गुंडाळी करताना कापड हळूहळू सोडवून घ्यावे. हे रोल मोदक पात्रात वाफवून घ्यावेत व गार झाल्यावर वड्या कापाव्यात.

कढईत मोहरी-जिरे-हिंगाची फोडणी करावी. फोडणीतच थोडे पांढरे तीळ व कढीलिंब घालावा व कापलेल्या वड्या घालून परतावे. वर डेकोरेशनसाठी पुन्हा कोथिंबीर व खोबरे घालावे. उकडल्यानंतर या वड्या कापून फ्रायपॅनमध्ये थोड्या तेलावर तळल्या तरी छान लागतात.

## सौंदर्य

### मधाने मिटवा मुरम

मध ॲण्टीबायोटिक असल्यामुळे मुरमे नाहीशी करतो. याचा कसलाही साईड इफेक्ट नसतो. यामुळे त्वचा मुलायम होते. हा फक्त पाच मिनिटे चेहऱ्यावर लावून साध्या पाण्याने चेहरा धुवावा.

## सल्ला

पाय दुखणे – पाव चमचा कच्चे तीळ चावून खावेत. महिनाभर हा उपाय केल्याने पाय दुखणे थांबते.

## वास्तू

कोणत्याही दरवाजावर किंवा दरवाजाच्या वरती कॅलेंडर टांगू नये.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २५ मे २०२४

--, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, ज्येष्ठा १०|३६

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य-**

मेष : जोडीदारा बरोबर तणाव ठेऊ नका. मतभेदांपासून लांब रहा. व्यापार राहील. विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये. व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ.

वृषभ : अधिकारांचा योग्य उपयोग करून घ्याल. मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग. धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल. अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील.

मिथुन : कार्यक्षमता वाढल्याने उत्साह वाढेल. अभीष्ट सिद्धी होईल. फायदा होईल. विरोधक करार करतील. व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल.

कर्क : अध्ययनात रूचि वाढेल. कामांची प्रशंसा होईल. भागीदारी पक्षात होऊ शकते. अर्थप्राप्ती झाल्याने खर्चाचे प्रश्न सुटतील.

सिंह : उपजीविकेच्या स्त्रोतांमुळे लाभ प्राप्ति. भागीदारीतून विशेष लाभ. उपजीविकेच्या स्त्रोतातून लाभ होईल, लोकप्रियतेत वृद्धि होईल. रोग, ऋण संबंधी कार्यात विशेष लाभ.

कन्या : काळजीपूर्वक काम करा. कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील. पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. व

तूळ : आजचा दिवस कठोर परिश्रम करण्यात जाईल. आजची संध्याकाळ मित्रांबरोबर व्यतित करण्याच्या प्रयत्न करा. मानसिक सुखशांती मिळेल.

वृश्चिक : प्रवासासाठी दिवस उत्तम आहे व वरिष्ठांशी संपर्क आपल्यासाठी आनंद देणारा ठरेल. मनोरंजनासाठी वायफळ खर्च करु नये. व्यस्त रहाल. जोडीदाराबरोबर घालवलेली वेळ सुखद राहील.

धनु : काळ अनुकूल आहे कामे सहज होतील. राजकारणी लोकांना पाठिंबा मिळेल. मन उल्हासित होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.


मकर : कामाचा भार अधिक राहील. जोखमीची कामे टाळा. महत्वाचे काम टाळा. कौटुंबिक सभासदांशी वादविवाद टाळा. एखाद्याच्या सहयोगाने कार्ये पूर्ण होतील. देवाण-घेवाण टाळा.

कुंभ : आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. इतरांना सहकार्य केल्याने वाद उद्भवू शकतात. एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. कोणतेही कार्य घाईगर्दीत करणे टाळा. शेयर व इतर कुठेही गुंतवणूक टाळा.

मीन : प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य उत्तम राहील. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# शब्दगंध क्र. ६९३० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) बर्फाचे शिवलिंग तयार होणारे हिमालयातील एक तीर्थक्षेत्र ५) एक मूल्यवान लाकूड व त्याचे झाड ७) गावातील सार्वजनिक जागा; कोतवाल कचेरी ८) भाकरी ज्यात थापल्या जातात ते लाकडी पात्र १०) रक्तवाहिनी; धमनी; शीर ११) कितीही मिळाले तरी तृप्त न होणारा १२) पिकांवर पडणारा एक रोग १४) बांगला देशचे चलन १६) वेगाने वाहणारी हवा; पवन १८) रजक; धोबी २०) चहा पिण्याचे एक भांडे २२) मकरंद; मध २३) पाढ्यातील सहाची संज्ञा २४) देश सोडून पळून गेलेला २६) वस्तू; नग; कलंक २७) शोभिवंत रचना; देखावा; मखर

**उभे शब्द :-** १) एकाएकी; अकस्मात; आकस्मिक २) धन; वित्त ३) खेळात चिडणे किंवा खोटे खेळणे ४) शीण; थकवा; मरगळ ५) सावली; छाया ६) चमू; पक्ष; ग्रुप; समूह ९) भीतीने होणारा शरीराचा कंप १३) बासरी; अलगूज; मुरली १५) अंदाज; कयास; अनुमान १७) एक मराठी संत १९) एक केसाळ प्राणी; अस्वल २०) कापड; वस्त्र; वसन २१) फुलातील रजःकण २५) सरहद्द; सीमा; बॉर्डर

**शब्दगंध क्र. ६९२९ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११३९ चे उत्तर**



# ✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱ मुलांचे विश्व ✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : दुसऱ्यांचे पाप आपल्या नजरेसमोर घडत असते, तर आपले पाप आपल्या पाठीमागे घडत असते. – **सेनेका**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### हिवाळा थंड आणि उन्हाळा गरम का असतो?

खरं तर हा प्रश्न, पृथ्वीवर ऋतुचक्र का असतं? असा विचारायला हवा. जगात विषुववृत्त सोडून कुठंही जा, वर्षभर एकच ऋतू असत नाही. तापमान एकसारखे असत नाही. त्यात वाढ-घट होतच राहते. तशी ती दिवसभराच्या २४ तासांतही होत असते. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत एकच तापमान असत नाही; पण त्यातल्या कमाल आणि किमान तापमानातला फरक हा उन्हाळ्यातल्या कमाल आणि हिवाळ्यातल्या कमाल तापमानाइतका असत नाही. उन्हाळ्यात कमाल तापमान भारीच चढते. राजस्थानात काही ठिकाणी तर ते चक्क ५० अंशांइतकं चढते; पण तिथंच हिवाळ्यात ते सात-आठ अंशांपर्यंत उतरते. अमेरिकेतील मध्य भागातल्या कान्साससारख्या राज्यात तर उन्हाळ्यात ४० अंशापर्यंत चढणारे तापमान हिवाळ्यात शून्याखाली ४० अंशांपर्यंत उतरते. साहजिकच मग उन्हाळ्यात तापमान इतके का वाढते आणि हिवाळ्यात इतके का घसरते, असा सवाल उठतोच. त्यातही विषुववृत्तावर हा फरक अत्यंत कमी असतो; पण विषुववृत्तापासून जसजसे उत्तरेकडे वा दक्षिणेकडे जावे तसतसा हा फरक वाढत जातो.

काही जणांची असा समज होता, की तापमानातला हा फरक पृथ्वीच्या सूर्यापासूनच्या अंतरावर अवलंबून आहे. जेव्हा पृथ्वी सूर्याच्या थोडीशी जवळ जाते तेव्हा तापमान चढते आणि जराशी दूर गेल्यावर उतरते. सूर्याभोवती प्रदक्षिणा घालण्याची पृथ्वीची कक्षा लंबवर्तुळाकार असल्यामुळे सूर्यापासूनच्या पृथ्वीच्या अंतरात फरक जरूर पडतो; पण त्याच्या परिणामी तापमानातला हा बदल संभवत नाही. कारण उत्तर गोलार्धात जेव्हा हिवाळा असतो त्यावेळी म्हणजे जानेवारीत पृथ्वीचे सूर्यापासूनचे अंतर सर्वात कमी असते, तर जुलैमध्ये ते सर्वात जास्त असते. तेव्हा तापमानातल्या फरकाचे ते कारण असू शकत नाही.

त्याचे खरे कारण म्हणजे, आपल्या पृथ्वीचा आस सरळसोट उभा नसून तो कललेला आहे. उभ्या रेषेशी तो २३ अंशांचा कोन करून जातो. त्यामुळे सूर्याभोवती प्रदक्षिणा घालताना पृथ्वीचा उत्तर गोलार्ध कधी सूर्याच्या दिशेला कललेला असतो, तर कधी दक्षिण गोलार्ध. त्यामुळे त्या प्रदेशावर पडणाऱ्या सूर्याच्या किरणांचा कोन वेगवेगळा असतो. उन्हाळ्यात ते जवळजवळ उभे आदळतात. त्यामुळे त्यांचा सारा मारा एकाच ठिकाणी होतो. ते फारसे पसरत नाहीत.

साहजिकच सारी उष्णता कमी क्षेत्रफळाच्या प्रदेशात शोषली जाते. शिवाय दिवस मोठा असल्यामुळे जास्त वेळ सूर्यकिरण धरतीला तापवत राहतात. ती उष्णता कमी होण्यासाठी आवश्यक तेवढा वेळ मिळत नाही.

उलट हिवाळ्यात किरणांचा कोन उथळ असतो. ते जवळजवळ आडवे येतात व इतस्ततः पसरतात. त्यापायी मग उष्णता एकाच ठिकाणी केंद्रित न होता इकडे तिकडे पसरते. शिवाय दिवसही लहान असल्यामुळे शोषलेल्या उष्णतेचा विचारही लवकर होतो. तापमान फारसे चढत नाही. उलट घसरायला मदत होते.

## भांडखोर शेजारी

दोन भांडखोर कोंबडे एके ठिकाणी चरत असताना अकस्मात त्यांची समोरासमोर गाठ पडली आणि मुळचेच आक्रमक स्वभावाचे असल्याने ते एकमेकांच्या अंगावर धावून जाऊ लागले. पिसे उभारुन, तुरे उंचावून, पंखांचा फडफडाट करुन त्यांनी लढाईचा पवित्रा घेतला.

एकमेकांना टोचे मारुन बराच वेळ ते लढत होते. अखेर एकमेकांना रक्तबंबाळ करीत थकल्यावर जे जमिनीवर आडवे पडून कण्हू लागले.

ते पाहून जवळच चरत असलेले बदक त्यांना म्हणाले,

''किती मूर्ख आहात दोघेही. शेजारी-शेजारी राहून असे सारखे भांडत असता. इकडचा दाणा त्याने खाल्ला किंवा तिकडचा दाणा याने खाल्ला, तरी तुम्हाला भांडणाला निमित्त मिळते. नुसता एकमेकांचा आवाज ऐकूनसुद्धा तुम्ही एकमेकांवर तुटून पडता. काय मिळते तुम्हाला? यात फायदा तरी काही नाही, पण एक पाय मोडून घेऊन जायबंदी मात्र होता.''

**तात्पर्य** : साध्या-साध्या कारणावरुन भांडण काढणे हे मूर्खपणाचे आहे.

## जीवन चक्र



उसी की बात गुरु अर्जनदेव जी महाराज कर रहे हैं कि जब हम किसी महापुरुष की शरण में आते हैं, वे हम पर दया-मेहर करते हैं और जो हमारे अन्दर Treasure-house of Divinity (रूहानियत का ख़ज़ाना) है, उसका दरवाज़ा खोल देते हैं, तो हम अन्दर के रहस्यों को पाना शुरू कर देते हैं। जैसे-जैसे हमारी आत्मिक तरक्की होगी, वैसे-वैसे हमारी मानसिक और शारीरिक तरक्की भी होती चली जाएगी। परम संत कृपालसिंह जी महाराज यह भी फ़रमाया करते थे, 'On spiritual health depends the health of the body and the mind,' हमारी रूहानी अवस्था पर ही हमारी मानसिक और शारीरिक अवस्था निर्भर है। अगर हमारी रूहानी अवस्था अच्छी है, तो हमारी मानसिक और शारीरिक अवस्था भी अच्छी होगी। अगर रूहानी अवस्था अच्छी नहीं है, तो मानसिक और शारीरिक अवस्था भी बेहतर नहीं हो सकती।

गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं कि जब हम पर सत्गुरु की कृपा होती है, तब हम सही तरीके से अन्दर और बाहर से प्रभु के रंग में रंग जाते हैं। फिर हमारा ध्यान चौबीसों घंटे प्रभु की ओर लगा रहता है और हम उस रास्ते पर कदम बढ़ाने लगते हैं, जिस पर चलकर हमारी आत्मा पर से सारे आवरण उतर जाते हैं। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

**अनद बिनोद करे दिन राती सदा सदा हरि केला जीउ।**

तब हम ऐसी अवस्था में पहुँच जाते हैं, जिसमें हम दिन-रात, २४ घंटे महवियत में, अमृत की मस्ती में रहते हैं और हर समय जो प्रभु का नाम है, उससे जुड़े रहते हैं। जैसे-जैसे शब्द हमें consume (सराबोर) करता है, हमारे शरीर और मन को consume (सराबोर) करता है, तो हमारी आत्मिक तरक्की होती है क्योंकि जब हम उस ज्योति के साथ जुड़ते हैं, तो जो हमारी जिंदगी में अंधेरा है, वह प्रकाश में बदल जाता है। हमारा ध्यान बाहर की दुनिया से हट जाता है क्योंकि हमें मिठास का ऐसा स्रोत मिल जाता है, जिससे बाहर की मिठास की चीजें फीकी लगने लगती हैं।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

गन्ने के पत्ते इत्यादि, जो जल्दी सड़ते नहीं है ऐसे पदार्थों का १५ से २० सेमी. मोटा थर बनाइये। इस पर पानी छिड़ककर गीला करके इसके ऊपर तैयार गोबर की खाद अथवा कम्पोस्ट खाद अथवा बगीचे की मिट्टी का ५ सेमी. का थर लगाएं। इससे केंचुएँ सुरक्षित होते हैं इसिके ऊपर पूर्ण केंचुएं छोड़ दें। प्रति १० स्क्वेयर फीट में २ हजार केंचुये छोड़ दें। इसे बारदाने से ढक देवें। ४० से ४५ डिग्री सेंटीग्रेड गीलापन रहे, इसकी सम्भाल रखें। शेड में २० से ३० डिग्री सेंटीग्रेड तापमान रखें। केंचुये की रक्षा के लिए अन्दर कोई कीट वा चींटी न आये, यह ध्यान रखना जरुरी है। एक-दो दिन में आवश्यकता अनुसार पानी छिड़कें। ५०-६० दिन में पूरी तरह से केंचुवा खाद तैयार हो जायेगी। केंचुएँ अलग करके, खाद को गीली जमीन में मिलाएं।

**खाद बनाने की पद्धति में भी योग का प्रयोग**

गोबर की खाद, केंचुवा खाद तथा जीवामृत का खेती में उपयोग करने से पहले कम से कम १० मिनट तक परमात्म शक्तियों से चार्ज करना आवश्यक है। मैं आत्मा मास्टर सर्वशक्तिवान हूँ... । अनुभव करें कि परमात्मा की सर्वशक्तियाँ मुझ आत्मा में उतर रही हैं...जो मेरे से खाद में किरणों के रूप में प्रवाहित हो रही है...।

संकल्प करें कि आपको फसल को निरोगी और शक्तिशाली रूप से बढ़ने में इन शक्तियों की सहयोगी बनना है... । परमात्म शक्तियों से यह खाद शुद्ध और शक्तिशाली बन रही है... इसमें कोई भी अशुद्धता नहीं है... परमात्म शक्तियों से इसमें से जीवाणु बहुत ही कार्यक्षम हो रहे हैं... आवश्यक मूल द्रव्य पौधों को समय पर तुरंत उपलब्ध हो रहे हैं... ऐसा अनुभव करें। प्रकृति में होने वाले बदलावों को और प्रहारों को सहने व सामना करने की शक्ति कुदरत ने सभी प्रकार की वनस्पति को दी हुई है। अगर जमीन शक्तिशाली है तो वनस्पति भी शक्तिशाली बनती है।

उसकी रोग प्रतिकारक शक्ति बढ़ती है, कोई भी कीट या फफंदी जैसी बीमारी आयेगी तो भी वह ठहरेगी नहीं। यदि जमीन शक्तिशाली नहीं होगी तो वनस्पति कमजोर बनती है और कीट तथा बीमारी का प्रतिकार नहीं कर पाती है इसलिए कीटनाशक दवाइयों का इस्तेमाल करना पड़ता है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एका वधू-वर सूचक मेळाव्यात मुलगा व मुलगी बोलत असतात

**मुलगा :** भावी लाईफ पार्टनर बद्दल काय अपेक्षा आहेत?

**मुलगी :** त्याचा मस्त बंगला असावा त्याच्याकडे फोरव्हिलर असावी तो एकुलता एक असावा...म्हणजे आई, वडील, भाऊ, बहिण नसावे...


**मुलगा :** अजुन काही अपेक्षा

**मुलगी :** मुख्य म्हणजे तो समजूतदार असावा...

**मुलगा :** अगं बाई, जर तो समजूतदार असेल तर तुझ्याशी लग्न कशाला करेल विहिरीत जीव नाही देणार का?

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



मी डोळे उघडे ठेवून पाहतो हसतो
त्याचे सौंदर्य सगळीकडे
डोळा भरुन पाहतो

**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

आई होणे ही अतिशय आनंदाची बाब आहे. परंतु, हा आनंद प्रत्येक स्त्रीच्या वाट्याला येतोच असे नाही. लग्नानंतर नैसर्गिकपणे मूल होते. परंतु पती-पत्नीपैकी एकाच्या प्रजननसंस्थेत दोष असला, की वंध्यत्वाला सामोरे जावे लागते. एखाद्या दांपत्याला मूल होत नसेल, तर अशा वेळी स्त्रीला दोष दिला जातो. परंतु हे अतिशय चुकीचे आहे. बऱ्याच वेळेला वंध्यत्व असणाऱ्या दांपत्यापैकी पुरुषांमध्ये दोष आढळून येतो. वंध्यत्व असलेल्या १०० दांपत्यांपैकी २५% दोष पुरुषांमध्ये आढळतो; तर ५०% दोष स्त्रियांमध्ये आढळतो. उरलेला २५% दोष मात्र पती आणि पत्नी या दोघांमध्ये असण्याची शक्यता असते. वंध्यत्व आले म्हणून हताश न होता योग्य उपचार केले तर आपल्याला यश मिळते.

भारतीय संस्कृतीमध्ये उगम पावलेले आयुर्वेदशास्त्र व आधुनिकशास्त्र यांचा मेळ घालून संयुक्त उपचार पद्धतीने वंध्यत्वावर मात करता येते. आधुनिक शास्त्रातील तपासण्यांचा आधार घेऊन वंध्यत्वावर आयुर्वेदिक उपचार केले तर खरोखरच आश्चर्यकारक परिणाम बघावयास मिळतात.

**वध्यत्व म्हणजे काय?**

एक वर्ष पूर्ण होऊनही किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी जाऊनही, साधारणतः आठवड्यातून तीन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा शारीरिक संबंध ठेवूनही गर्भधारणा होत नसेल, तर अशा अवस्थेला वंध्यत्व म्हणतात.

गर्भधारणा कशी होते त्याची माहिती आपण 'विवाहेच्छुक मुलींसाठी मार्गदर्शन' या प्रकरणात घेतली आहे.

वंध्यत्वाची कारणे पुरुषांमध्ये शुक्रजंतू अजिबात तयार न होणे : खरे तर गर्भधारणा होण्यासाठी पुरुषांमध्ये प्राकृत शुक्रजंतूची निर्मिती होणे गरजेचे असते. प्राकृत शुक्रजंतूचे प्रमाण हे ६० ते १२० मिलियन्स एवढे असते. शारीरिक संबंधानंतर वीर्य गर्भाशयमुखापर्यंत पोहोचणे आवश्यक असते. काही स्त्रियांचे गर्भाशयमुख हे खालील बाजूस झुकलेले असते. अशा वेळेस शुक्रजंतू गर्भाशयात पोहोचत नाही, तसेच काही स्त्रियांना उष्णतेचा त्रास असतो. त्यामुळे योनीतील आम्लता वाढलेली असते. त्यामुळे योनीमध्ये पडलेले शुक्रजंतू मरण पावतात व गर्भधारणा होत नाही. वंध्यत्वाच्या कारणांचा विचार करताना अजुन काही कारणांचा देखील विचार करावा लागेल :

(क्रमशः)

**– डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा

### डॉ. शरद मोहरकर यांचे प्रतिपादन

नगर – रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा असून, या भावनेने रुग्णांना सेवा दिली जाणार आहे. मोठे बंधू अमृत मोहरकर व सुनीता मोहरकर यांनी कष्ट करून मला शिकवले व आज डॉक्टर होवून रुग्णांची सेवा करता येणार आहे. बिकट परिस्थितीची जाणीव असल्याने सेवाभाव हा उद्देश ठेऊन रुग्णांचे आरोग्य जपले जाणार असल्याची भावना डॉ. शरद मोहरकर यांनी व्यक्त केली.



तपोवन रोड येथे तपोवन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे फित कापून उद्घाटन करताना नामदेव मोहरकर. समवेत डॉ. शरद मोहरकर, सौ. पंचमुख मोहरकर आदी.

तपोवन रोड, येथे तपोवन मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचे उद्घाटन नामदेव मोहरकर व सौ. पंचफुला मोहरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ. सुरेश (अण्णा) धस, आ. संग्राम जगताप, माजी आमदार शिवाजी कर्डिले, अक्षय कर्डिले, मनोज कोतकर, संभाजी पवार, निखिल वारे, दत्ता तापकिरे, गजानन भांडवलकर, राजू मराठे, राहुल जगदाळे, जनार्धन माने, बबन कारंडे, राहुल पवार, प्रा. प्रसाद जमदाडे, अशोक खोकराळे, पै. प्रताप गायकवाड

### तपोवन हॉस्पिटलचे उद्घाटन

आर्दीसह परिसरातील उद्योजक, नागरिक व आष्टी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

आ. सुरेश धस म्हणाले की, एका सर्वसामान्य कुटुंबातील व छोट्या गावातील मुलगा मोठ्या कष्टाणे डॉक्टर होऊन नगर शहरात आपले हॉस्पिटल उभे करतो ही अभिमानाची बाब आहे. उपनगर भागातील नागरिकांना उत्तमप्रकारे आरोग्यसेवा मिळावी यासाठी हॉस्पिटलची केलेली उभारणी कौतुकास्पद आहे. कोरोना काळात आपल्या जीवाची बाजी लावून डॉ. शरद मोहरकर यांनी आष्टी या ठिकाणी कोविड सेंटर उभारले. त्यांच्या माध्यमातून हजारो रुग्णांना जीवदान मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले.

तपोवन हॉस्पिटलमध्ये अद्यावत आयसीयू विभाग, ऑपरेशन थेटर, स्पेशल रूम तसेच सर्पदंश, मधुमेह, उच्च रक्तदाब, ह्रदयाचे विकार, अपघाती रुग्णासाठी तातडीची सेवा, सर्जरी आदीची सोय आहे. तसेच सरकारी योजनांचा लाभ रुग्णांना मिळणार असून, कॅशलेस सुविधा असून, पॅथॉलॉजिस्ट डॉ. रूपाली बांगर एमडी मेडिसिन डॉ. शरद मोहरकर चोवीस तास रुग्णांसाठी उपलब्ध राहणार आहेत.

## उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज साहब स्वर्णिम संयम यात्रा एवम दीक्षा सुवर्ण जयंती वर्ष

### अखिल भारतीय स्तरावर भव्य नवकार मंत्र लेखन स्पर्धेचे आयोजन




नगर – आचार्य सम्राट आनंदऋषीजी महाराज यांचे लाडके सुशिष्य उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज स्वर्णिम संयम यात्रा एवम दीक्षा सुवर्ण जयंती वर्ष साजरे होत आहे. यानिमित्त उडान ग्रुप आणि जिव्हाळा ग्रुपच्या वतीने देशभरात भव्य नवकार मंत्र लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूदेवांचा ५० वर्षांच्या संयमी जीवनाचे अनुमोदन करण्याचा हा लहानसा प्रयत्न आहे.

संपूर्ण भारतात ही स्पर्धा होणार आहे. यात स्पर्धकाला असे चित्र तयार करायचे आहे की त्यात ५१ नवकार मंत्र समाविष्ट असतील. यातून एक सुंदर कलाकृती साकार व्हावी ही अपेक्षा आहे. स्पर्धा २४ मार्च रोजी सुरू झाली असून आपले चित्र सादर करायची अंतिम मुदत २५ जून २०२४ पर्यंत आहे. स्पर्धेसाठी वयाची अट नाही.

गुरुदेवांच्या स्वर्णिम संयम यात्रेनिमित्त आपण सुंदर, सुवाच्च हस्ताक्षरात आपण नवकार मंत्र भक्तीच्या पेपर वर उतरवून त्यांच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण करू असे आवाहन जिव्हाळा ग्रुपच्या अध्यक्षा अल्पना कासवा यांनी केले आहे.

स्पर्धेसाठी प्रथम पुरस्कार ५१ हजार रुपये, द्वितीय पुरस्कार ३१ हजार रुपये आणि तृतीय पुरस्कार ११ हजार रुपयांची ११ बक्षिसे आहेत. यांसह विविध विशेष पुरस्कारही देण्यात येणार आहेत. संपूर्ण भारतात विविध ठिकाणी नवकार मंत्र किट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आपली नवकार मंत्र चित्र नगरमध्ये अल्पना कासवा, अर्हम बंगला, बालाजी कॉलनी, नक्षत्र लॉन्स जवळ, बुरूडगाव रोड, अहमदनगर या पत्त्यावर जमा करावीत. अधिक माहितीसाठी संपर्क: ९४२२०१४२७४/ ८७८८५७२२८४.

## मेहराबाद नामकरणाला २५ मे रोजी १०१ वर्ष पूर्ण



नगर – अवतार मेहेरबाबा २५ मे १९२३ रोजी त्यांनी अरणगाव येथील त्याच्या आश्रमाला मेहराबादचा बोर्ड लावला, जो त्याचे शिष्य नवरस यांनी पेंट केला तेव्हापासून मेहराबाद (अरणगाव) नावाने हे ठिकाण आज जगप्रसिद्ध झाले आहे.

नगरमधील खुशरु क्वार्टरमधून अवतार मेहेरबाबा आपल्या निवडक शिष्याबरोबर गुस्ताजी, मासाजी, बुवासाहेब, स्लॅमसन, नवरस, पादरी व पेन्डू यांच्याबरोबर अरणगाव येथे पायी गेले तेथे ते प्रथम लिंबाच्या झाडाखाली थांबले अरणगाव मधील ही प्रॉपर्टी खुशरु इराणी व गुलुमाई इराणी यांच्या मालकीची होती. त्यावेळी याला मेहेराबाद नाही तर अरणगाव म्हणत, कारण ते जवळच्या गावाचे नाव होते. पण बाबांनी मेहेराबाद नाव दिले. ते येण्यापूर्वी पहिल्या महायुद्धात (१९१४–१९१८ पासून) हा भाग ब्रिटिश लष्करी तळ म्हणून वापरला जात होता. युद्धानंतर, जमीन आणि इमारतींचा लिलाव झाला आणि आदि के. इराणीच्या वडिलांनी त्या विकत घेतल्या.

बाबानी बुवासाहेब व स्लॅमसन यांना गावामध्ये जेवणाची व पाण्याची बादली आणण्यासाठी पाठवले त्यांना गंगाराम हे गृहस्थ प्रथम भेटले व त्यांनी भाकरी बनवून दिली व पाण्याची बादली दिली बाबांच्या शिष्यानी येथील रेल्वे लाइन शेजारी असणारे ब्रिटिशकालीन पोस्ट ऑफिस, मेस, क्वार्टरची दुरुस्ती करून स्वच्छ केले. राहण्या योग्य बनविले बाबा याठिकाणी ४ ते २५ मे १९२३ पर्यंत प्रथम राहिले व २५ मे रोजी येथे त्यांनी मेहराबादचा बोर्ड लावला जो त्याचे शिष्य नवरस यांनी पेंट केला, तेव्हापासून या नावाने हे ठिकाण आज जगप्रसिद्ध झाले आहे.

फेबुवारी १९५८ ला सहवास प्रोग्रॅममध्ये बाबांनी मेहेराबादबद्दल सांगितले, मी जेव्हा शरीर सोडेल तेव्हा माझा देह येथे राहील. जी पक्की समाधी जी १९३८ साली बनवली होती तेथे दफन करावा. बाबांनी सांगितले कि ७० वर्षानंतर हे जागतिक तीर्थक्षेत्र होईल व येथे करोडोच्या संख्येने देवाची भक्ती करणारे, ईश्वरप्रेमी येतील.

## अहमदनगर जिल्हा रिले स्केटिंग स्पर्धेत खेळाडूंचे घवघवीत यश

### गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार

नगर – नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य रिले स्केटिंग संघटनेच्या वतीने व छत्रपती संभाजी नगर जिल्हा रिले स्केटिंग संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय स्पीड व रिले स्केटिंग स्पर्धांचे आयोजन औरंगाबाद येथील विभागीय क्रीडा संकुल येथे पार पडले सदर स्पर्धामध्ये अहमदनगर जिल्हा रिले स्केटिंग संघटनेच्या खेळाडूने भाग घेत अत्यंत चुरशीची लढत देत पदकांची लयलूट केली.



अहमदनगर जिल्हा रिले स्केटिंग स्पर्धेत यश मिळविलेल्या खेळाडूंच्या सत्कार प्रसंगी अध्यक्ष झिशान शेख, सचिन गायकवाड, अक्षय चोपडे, सौ. सविता पाटोळे, नलिनी पाटोळे आदी.

निकाल पुढीलप्रमाणे : वैभव प्रदीप पाटोळे याने क्वॉड्स – १ सुवर्ण १ रौप्य १ कांस्य, तन्मय गोटे सुवर्ण व कांस्य, रोहित आव्हाड २ कांस्य, वरद पेद्राम १ सुवर्ण २ रौप्य, अर्सलान शेख १ रौप्य १ कांस्य, जैनब शेख १ सुवर्ण १ कांस्य, अक्रम शेख १ सुवर्ण १ कांस्य, हमजा शेख (सर्वोत्कृष्ट स्केटर) २ कांस्य.

या सर्व खेळाडूंचे या यशाबद्दल संघटने चे अधक्ष्य झिशान शेख यांनी खेळाडूंचे विशेष कौतुक करत मुलांचा सत्कार करण्यात आले यावेळी अध्यक्ष झिशान शेख समवेत टेनिस बॉल क्रिकेट संघटना संस्थापक सचिव सचिन गायकवाड, अक्षय चोपडे, टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीच्या अध्यक्षा सौ. सविता पाटोळे, एन एस पी फाउंडेशनचे नलिनी सुंदर पाटोळे, अविनाश गोटे, मुख्य प्रशिक्षक प्रदीप पाटोळे, सागर भिंगारदिवे, संदीप पेद्राम आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष झिशान शेख म्हणाले की, अहमदनगर जिल्हा रिले स्केटिंग संघटनेचे खेळाडूंनी अत्यंत चुरशीची लढत देत पदकाची लयलूट केली असून गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी याच मुलांची निवड झाली असून गोवा येथे खेळण्यासाठी जाणार असल्याचे सांगितले व क्रीडा अधिकारी व मनपा आयुक्त यांची भेट घेऊन शहरात एक भव्यदिव्य स्केटिंग ग्राउंड उपलब्ध करण्यासाठी मागणी करणार असल्याची भावना व्यक्त केली.

## नेत्रदान व अवयवदानच्या जनजागृतीने बुध्द पौर्णिमा साजरी

### फिनिक्स सोशल फाऊंडेशनने भरले नागरिकांचे संकल्प अर्ज

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने बुध्द पौर्णिमेनिमित्त शहरातील सिध्दीबाग येथील बुध्द विहारातील भगवान गौतम बुध्द यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानाची जागृती करण्यात आली.

मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानाचे महत्त्व विशद करुन नागरिकांना संकल्प अर्जाचे वाटप करण्यात आले. यावेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, भारतीय बौध्द महासभेचे प्रा. राम गायकवाड, उमेश मोरे, निलेश जाधव, नलिनी गायकवाड, अण्णासाहेब गायकवाड, अर्चना गायकवाड, वैशाली खंदारे, रजनी ताठे, आशाताई गायकवाड आर्दीसह समाजबांधव उपस्थित होते.



फिनिक्स सोशल फौंडेशनने बुद्धपौर्णिमेनिमित्त मरणोत्तर व अवयवदानचे नागरिकांकडून संकल्प फॉर्म भरून घेताना अध्यक्ष जालिंदर बोरुडे व इतर.


जालिंदर बोरुडे म्हणाले की, भगवान बुध्दांनी संपूर्ण जगाला करुणा आणि सहिष्णुतेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली. त्यांनी दिलेल्या शिकवणी, संदेश आणि विचार मानवाला यशस्वी व समाधानी जीवनाचा मार्ग दाखवित आहे. त्यांनी मानवतेची शिकवण देऊन, समाजातील हिंसा, अशांती, अंधविश्वास आणि अधर्म दूर करण्याचे कार्य केले. आज त्यांची प्रेरणा घेऊन समाजातील प्रत्येकाने मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे.

मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान होत नसल्याने अनेक रुग्ण नेत्र व अवयवाच्या प्रतिक्षेत आहे. एका व्यक्तीच्या अवयवदानाने सात व्यक्तींना जीवदान मिळते. शरीर हे नश्वर असून, मरणोत्तर अवयवदानाने एखाद्याचे जीवन फुलणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांचे नेत्रदान व अवयवदानाचे संकल्प अर्ज भरुन घेण्यात आले.



### गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीसुर्य बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्यावतीने अभिवादन

गौतम बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंतीनिमित्त महात्मा फुले चौक येथे क्रांतीसुर्य बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने पुतळ्यास अभिवादन करताना आ. संग्राम जगताप. समवेत प्रतिष्ठानचे संस्थापक रवींद्र कांबळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, माणिक विधाते, सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, परिमल निकम, डॉ. रणनवरे, ज्ञानदेव पांडुळे, महादेव कराळे, बाळू गायकवाड, योगेश डोंगरे, प्रा. जाधव, प्रा. बेंद्रे, अभिजीत खोसे, प्रकाश खंडागळे, अनिल तिजोरे, गणपत माने, सुनील थोरात, कौशल गायकवाड, सचिन आल्हाट, छाया शिरसाट, सुमन कांबळे, शारदा अरुण, सुरेखा शिंदे, सुरेखा पगारे आर्दीसह नागरिक. (छाया – लहू दळवी)



### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्त अभिवादन

संपूर्ण विश्वाला शांती आणि अहिंसेचा संदेश देणारे, तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे अभिवादन करताना पक्षाचे अध्यक्ष अभिषेक कळमकर, महिला शहराध्यक्ष नलिनीताई गायकवाड, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष नीताताई बर्वे, शहर सचिव रजनीताई ताठे, युवती समन्वयक खुशी जाधव, भीमराज आव्हाड, रोहन शेलार, बाबा ढाकणे, संदीप गायकवाड, संजय कांबळे, राहुल पगारे, हरीश पंडागळे, अतुल शिंदे, हरीश आल्हाट आदी.

## भगवान गौतम बुद्धांचे विचार व संदेश आत्मसात करावे

### शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांचे प्रतिपादन; भारतीय जनता पार्टीच्यावतीने अभिवादन

नगर – भगवान गौतम बुद्ध यांनी विश्व बंधुत्व, समता, न्याय, करुणेचा संदेश देऊन गेले आहेत. मानवाच्या दु:ख मुक्तीचा विचार तथागत भगवान बुद्धांनी जगाला सांगितला आहे. बौद्ध धर्म हा पुरातन आणि विज्ञानावर आधारित मानवता शिकविणारा धर्म आहे. त्यांचे आचरण आणि विचारधारा तितक्याच पवित्र पद्धतीने समाजात रुजविणे गरजेचे आहे. भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भगवान गौतम बुद्धांचे विचार आणि संदेश आत्मसात करुन वाटचाल करावी, असे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केले.



नगर शहर भारतीय जनता पार्टीच्यावतीने भगवान गौतम बुद्धांच्या जयंतीनिमित्त सिद्धीबाग येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले.

नगर शहर भारतीय जनता पार्टीच्यावतीने भगवान गौतम बुद्धांच्या जयंतीनिमित्त सिद्धीबाग येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी ॲड.अभय आगरकर, वसंत लोढा, सरचिटणीस प्रशांत मुथा, उपाध्यक्ष सचिन पारखी, महिला आघाडी अध्यक्षा प्रिया जानवे, मध्य मंडल अध्यक्ष राहुल जामगावकर, गोपाल वर्मा, अनिल मोहिते, बाळासाहेब भुजबळ, दत्ता गाडळकर, सचिन कुसळकर, ज्ञानेश्वर धिरडे, वैभव झोंटिंग, राजेंद्र सातपुते, सचिन पळशीकर, अशोक गायकवाड, संजय ढोणे, बाबा सानप, सुनिल तावरे, गवई गटाचे सुमेध गायकवाड, आर.पी.आय.चे निखिल साळवे, नितीन कसबेकर, पियुष जग्गी, पिंटू ढोणे, नरेश चव्हाण, विलास नंदी, पंडित वाघमारे आदि उपस्थित होते.

यावेळी बुद्ध वंदना म्हणून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.

## प्रसार भारतीच्या 'डीडी उर्दू' वर कवयित्री डॉ. कमर सुरुर यांच्या शायरीचे प्रसारण



नगर – येथील कवयित्री डॉ.कमर सुरुर यांना प्रसार भारतीच्या डीडी उर्दूच्या कवी हाजीर है या कार्यक्रमात निमंत्रित करण्यात आले होते. दोन भाग त्यांच्या शेर शायरीचे रेकॉर्ड करण्यात आले. त्यातील पहिल्या भागाचे प्रसारण प्रसार भारतीच्या डीडी उर्दू वर २५ मे रोजी रात्री ८ वाजता प्रसारित होणार असून दुबार प्रसारण २६ मे रोजी रात्री ८ वाजता प्रसारित होणार आहे.

या शेर शायरीचा आनंद गझल रसिकांनी अवश्य घ्यावे, असे आवाहन अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे सचिव आबीद दुलेखान यांनी केले आहे.

## गौतम बुद्धांचे विचार समाजाकरिता प्रेरणादायी

### माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे; बुद्ध पौर्णिमेनिमित्त शिवसेनेतर्फे (उध्दव ठाकरे गट) पुष्पहार अर्पण करून अभिवादन

नगर – प्रत्येकाच्या जीवनात दुःख आहे परंतु समाधानी असणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आत एक बुद्ध असतो गौतम बुद्धांचे विचार समाजाकरिता प्रेरणादायी असल्याने ते आचरणात आणा असे प्रतिपादन माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केले.

बुद्ध पौर्णिमेनिमित्त भगवान बुद्धांच्या मूर्तीस शिवसेना (उध्दव ठाकरे गट) वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, झेंडे मामा, निखिल साळवे, सुमेध गायकवाड, काँग्रेसचे सुनील क्षेत्रे, परेश लोखंडे, माजी नगरसेवक अजय साळवे, प्रा. जयंत गायकवाड, महेश भोसले, अरुण झेंडे, मुन्ना भिंगारदिवे, अजय भिंगारदिवे, निखिल साळवे आदी उपस्थित होते.



बुद्ध पौर्णिमेनिमित्त भगवान बुद्धांच्या मूर्तीस शिवसेना (उध्दव ठाकरे गट) वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. (छाया– उदय जोशी)



तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एच.एस.सी. (१२ वी) परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा राखणारे विद्यार्थी, प्राचार्य मच्छिंद्र गोसावी व शिक्षकवर्ग.

## वृध्देश्वर विद्यालयाचा बारावी परीक्षेत उत्कृष्ट निकाल

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेच्या तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांनी चांगले यश मिळवून विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली.

फेब्रुवारी/मार्च २०२४ मध्ये झालेल्या बारावी परीक्षेत विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल शेकडा ९६.१२, कला शाखेचा निकाल शेकडा ७५.७१ व किमान कौशल्य शाखेचा निकाल शेकडा ९२.८५ इतका लागला.

यामध्ये विज्ञान शाखेत खाडे सार्थक भगवान (७९.८३%) व केदार आदित्य विठ्ठल (७९.८३%) प्रथम, लवांडे वैष्णवी सतिष (७९.००%) द्वितीय व आव्हाड पूजा सुनिल (७८.५०%) हिने तृतीय क्रमांक मिळविला. कला शाखेत मरकड भक्ती सुभाष (७३%) प्रथम, राठोड रुक्मिणी साहेबराव (६८%) द्वितीय व बागवान अलिम अकबर (६७.६७%) याने तृतीय क्रमांक मिळविला.

किमान कौशल्य विभागात गाडेकर आदित्य ज्ञानेश्वर (६५.३३%) प्रथम, शेळके यश अनिल (६३.८३%) द्वितीय व दरेकर सिध्दार्थ राजेश (६३.६७%) याने तृतीय क्रमांक मिळविला. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा विद्यालयात सत्कार करण्यात आला.

बारावी परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सेक्रेटरी अ‍ॅड.विश्वासराव आठरे, सहसेक्रेटरी जयंत वाघ, खजिनदार अ‍ॅड.दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे सदस्य डॉ.बाळकृष्ण मरकड, चंद्रकांत म्हस्के, अरविंद आठरे, काशिनाथ पा. लवांडे, सरपंच इलियास शेख, विद्यालयाचे प्राचार्य मच्छिंद्र गोसावी, पर्यवेक्षक केशव जाधव व दादासाहेब मरकड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## निस्वार्थ रुग्णसेवेतून अनेकांना नवजीवन देणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल

### किरण धोका यांचे प्रतिपादन; आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णांची मोफत हृदयरोग तपासणी, शिबिराला प्रतिसाद



श्री आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये पुणे येथील व्यापारी धोका परिवाराच्यावतीने आयोजित मोफत हृदयरोग शिबिराचे दिपप्रज्वलनाने उद्घाटन करताना सुहास धोका, किरण धोका, डॉक्टर्स.

नगर – निस्वार्थ रुग्णसेवेतून अनेकांना नवजीवन देणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल मानवतेचे प्रतिक बनले आहे. सेवेसाठी हातभार लावणारे व सेवा कार्याचा लाभ घेणारे या आरोग्यमंदिराकडे ओढले जात आहे. या आरोग्यसेवेची ख्याती संपूर्ण राज्यात पसरली असून, या आरोग्य मंदिरातून चोवीस तास मानवसेवा घडत आहे. या मानवसेवेच्या कार्यात हातभार लाऊन आत्मिक समाधान मिळत असल्याची भावना किरण धोका यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये पुणे येथील व्यापारी धोका परिवाराच्या वतीने आयोजित मोफत ह्रयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्धाटनाप्रसंगी किरण धोका बोलत होत्या.

यावेळी सुहास धोका, वैभव धोका, नितीन धोका, सुशील धोका, लौकिक धोका, रोहन धोका, रिदित धोका, प्रकाश छल्लाणी, मंगलताई छल्लाणी, वर्षा संचेती, चंदन काठेड, सतीश लोढा, मानकचंद कटारिया, सुभाष मुनोत, डॉ. वसंत कटारिया, निखीलेंद्र लोढा, डॉ. आशिष भंडारी, कार्डिओलॉजीस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अमित थोपटे, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. विनय छल्लाणी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले की, हॉस्पिटलमध्ये असलेला अद्यावत कार्डियाक विभाग आरोग्यसेवेचा आधार असून, कॅथलॅब देशातील सर्वोत्कृष्ट कॅथलॅब म्हणून नावारुपास आली आहे. कार्डियाक विभागात लहान मुलांपासून वयोवृध्दांपर्यंतच्या हृदयाच्या सर्व शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्या जात आहे. हॉस्पिटलमध्ये अद्याप पर्यंत ५० हजारपेक्षा जास्त बायपास सर्जरी, ७० हजारपेक्षा अधिक एन्जोप्लास्टी व एक लाखापेक्षा अधिक अँजिओग्राफी करण्यात आलेली आहे. तसेच ६ हजार लहान बालकांच्या ह्यरोग संबंधी यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. या सेवाकार्यात प्रकाश छल्लाणी परिवाराचे मोठे योगदान मिळत असून, पुणे येथील त्यांची दिलेली मुलगी, जावई आणि संपूर्ण धोका परिवार या सेवा कार्यात जोडले गेले आहे. सेवा कार्याच्या संस्कारातून त्यांचे सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी छल्लाणी व धोका परिवाराचे सेवा कार्याचे कौतुक केले.

वर्षा संचेती म्हणाल्या की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये चोवीस तास रुग्णसेवा केली जात आहे. या सेवा कार्यात सर्व संचालक तन–मन–धनाने योगदान देत असून, निस्वार्थ भावनेने त्यांची सुरू असलेली सेवा प्रेरणादायी आहे. सेवेचे संस्कार कुटुंबातूनच मिळाले असल्याने या सेवा कार्यात सहभागी होण्याचे भाग्य मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

शिबिरात १२५ रुग्णांची मोफत हृदय तपासणी करण्यात आली. शिबिरात सहभागी गरजूंची ३ हजार रुपयात अँजिओग्राफी करण्यात आली. गरजेनुसार रुग्णांची बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजविणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी अल्पदरात केल्या जाणार आहेत. तर महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत होणार आहेत. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार निखीलेंद्र लोढा यांनी मानले.

## राज्यात व जिल्ह्यात प्रथम येत विद्यार्थ्यांनी सारडा महाविद्यालयाचे नावलौकिक वाढवले

### प्रा.शिरीष मोडक यांचे प्रतिपादन



१२ बोर्ड परिक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयातील उच्च श्रेणीने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, सुमतिलाल कोठारी, अजित बोरा, डॉ.पारस कोठारी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य मंगला भोसले, प्रबंधक अशोक असेरी, पर्यावेक्षक सुजीत कुमावत, प्रा.गिरीश पाखरे आर्दीसह यशस्वी विद्यार्थी.

### पेमराज सारडा महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

नगर – कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत पेमराज सारडा महाविद्यालयाचा यशाचा आलेख गुणवंत विद्यार्थी उंचावत आहेत. राज्यात व जिल्ह्यात प्रथम येत विद्यार्थ्यांनी सारडा महाविद्यालयाचे नावलौकिक वाढविले आहे. खूप कष्ट व प्रयत्नांनी मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या या यशात प्राध्यापकांचे मार्गदर्शनही बहुमोल आहे. या यशामुळे भविष्यात तुम्ही कर्तुत्वसंपन्न जीवन जगाल, अशा शुभेच्छा प्रा.शिरीष मोडक यांनी दिल्या.

नुकत्याच जाहीर झालेल्या १२ बोर्ड परिक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयातील उच्च श्रेणीने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी प्रा.मोडक बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे चेअरमन सुमतिलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, डॉ.पारस कोठारी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य मंगला भोसले, प्रबंधक अशोक असेरी, पर्यावेक्षक सुजीत कुमावत, प्रा.गिरीश पाखरे आर्दीसह प्राध्यापक, यशस्वी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश प्राप्त करत महाविद्यालयाच्या यशस्वी निकालाची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ८६% इतका लागला. यात सारडा महाविद्यालयाची विद्यार्थिनी अनुष्का वाघुले हिने ९०.५० टक्के गुण व इतिहासात ९८ गुण मिळवत कला विभागात राज्यात पहिली येत इतिहास रचला आहे. तसेच साक्षी दौलतानी हीने अकाऊंट विषयात १०० गुण मिळवून व ९३.८३% गुण मिळवत वाणिज्य शाखेमध्ये नगर जिल्ह्यात सर्वप्रथम येण्याचा मान पटवला आहे. अंकुश चुग याने अकाऊंट विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवून जिल्ह्यात सर्वप्रथम आला आहे. प्राप्ती मुनोत ही अर्थशास्त्र विषयात ९७ गुण मिळवून नगर मध्ये सर्वप्रथम आली आहे. विज्ञान विभागात अर्पिता झुंजूर ही ८८.१७% गुण मिळवत महाविद्यालयात पहिली आली आहे. तर द्वितीय युवराज वारे ८७.३३ % द्वितीय व गौरवी ठाणगे ८६.६७ % गुण मिळवत तृतीय आली आहे. वाणिज्य विभागात मिताली संचेती ९०.६७ % गुण मिळवले आहेत. कला विभागात ईश्वरी पिंपरकर ८८.३३% व केशर मुसळे ८२% गुण मिळवले आहेत.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, सारडा महाविद्यालयाची अनुष्का वाघुले ही कला विभागात राज्यात पहिली आल्याचा सार्थ अभिमान महाविद्यालयास आहे. कला विभागात राज्यात प्रथम येणे सोपे नाही. पण स्वकष्टाने व प्राध्यापकांच्या योग्य मार्गदर्शनाखाली हे यश मिळवता आले आहे. महाविद्यालयात सुविधांयुक्त शिक्षण उपलब्ध आहे.

यावेळी अजित बोरा यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना रोख बक्षिसे दिले. तसेच डॉ.पारस कोठारी यांनीही शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी महाविद्यालयाचा उंचावत चाललेल्या आलेखाची माहिती देत यशाची घोडदौड अशीच पुढेही चालत राहील असा विश्वास व्यक्त केला. सूत्रसंचालन प्रा.राजू रिक्कल यानी केले. उपप्राचार्य मंगला भोसले यांनी आभार मानले.



नगर जिल्ह्यातील पैलवान दिपक रावसाहेब उमाप यांना सातारा, खेड येथे काळभैरवनाथ यात्रेत कुस्ती स्पर्धेत चांदीची गदा मिळाली.



बुद्ध पौर्णिमेनिमित्त सिद्धीबाग येथे गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास अभिवादन करताना आ. संग्राम जगताप. समवेत मनपा उपायुक्त श्रीकांत पवार, अशोक गायकवाड, प्रा.माणिकराव विधाते. (छाया – लहू दळवी)

## गौतम बुद्धाच्या विचारांचे अनुकरण प्रत्येकाने करावे

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; बुद्ध पौर्णिमेनिमित्त पुतळ्यास अभिवादन

नगर – गौतम बुद्धाच्या विचारांचे अनुकरण प्रत्येकाने करावे आणि शांतीच्या मार्गाने विचार करण्याची आवश्यकता आहे. त्या माध्यमातून चांगले विचार निर्माण होत असतात. अवघ्या जगाला अहिंसा आणि करुणेची शिकवण गौतम बुद्ध यांनी दिली. त्यांचे अमूल्य विचार समस्त मानवांना जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि पुढे जाण्याची प्रेरणा देतात. गौतम बुद्ध यांचे विचार भारतासह जगभरात विखुरले आहेत. मानवाने शुद्ध विचार, आचार अंगीकारला पाहिजे असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

बुद्ध पौर्णिमेनिमित्त सिद्धीबाग यथे गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास अभिवादन करताना आ. संग्राम जगताप, उपायुक्त श्रीकांत पवार, अशोक गायकवाड, प्रा.माणिकराव विधाते, सुरेश बनसोडे, इंजि.परिमल निकम, महादेव कराळे, नगरसचिव राजेश लयचिट्टी, जयंत गायकवाड, अजय साळवे, महेश भोसले, कौशल्य गायकवाड आर्दीसह नागरिक उपस्थित होते.

यावेळी सिद्धीबाग येथे गौतम बुद्ध यांच्या ५५६ व्या जयंती निम्मित विविध धार्मिक कार्यक्रम उत्सहात झाले.

## ३० वर्षांनी बबिता साळवे १२ वी आर्टस्‌मध्ये डिस्टिंक्शन मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

### भाई सथ्था नाईट हायस्कुलचा ५५.५५ टक्के निकाल



३० वर्षांनी बबिता साळवे १२ आर्टस्‌मध्ये डिस्टिंक्शन मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना प्राचार्य सुनील सुसरे.

नगर – कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि हलाखीच्या परिस्थिती मुले शिक्षण अर्धवट राहून मागे पडलेल्या सौ. बबिता पोपट साळवे या वयाच्या चाळीशी मध्ये इयत्ता १२ वी आर्टस्‌मध्ये डिस्टिंक्शन मिळवून उत्तीर्ण झाल्या आहेत.

हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कुलमध्ये त्या शिकत होत्या. त्यांना दोन मुले असून एक मुलगा अंडरग्रॅज्युएट तर दुसरा मर्चंट नेव्ही मध्ये आहे. त्यांचा अभ्यास घेत असताना पुन्हा शिक्षण घेण्याची त्यांची उमेद जागी झाली आणि त्यांनी ३० वर्षांनी प्राचार्य सुनील सुसरे यांची भेट घेतली. १२ वी ची परीक्षा आपण देऊ शकतो का? याची चौकशी केली. तेव्हा सुसरे सर यांनी त्यांना पुन्हा शिक्षण सुरु ठेवण्याची उभारी दिली.

आपले घर संसार, आणि स्टार हेल्थमधील नोकरी सांभाळून त्यांनी रात्र शाळेच्या वर्गात नियमित हजर राहून त्यांनी यश संपादन केले. त्यांना प्राचार्य सुनील सुसरे, प्रशांत शिंदे सर, अशोक शिंदे सर, पवार सर, पीपाडा सर, करंडे सर, घुटे सर यांनी मार्गदर्शन केले.

सौ. बबिता साळवे यांनी ९३–९४ साली दहावीची परीक्षा दिली. बालिकाश्रम विद्यालय येथे अकरावी पण झाली पण लगेच लग्न झाले, यामुळे १२ वी ची परीक्षा दिलीच नव्हती. लग्न झाल्यानंतर सासरची जबाबदारी पडल्यामुळे पुढे शिकता आले नाही. आता २०२४ मध्ये त्यांनी भाई सथ्था नाईट हायस्कूलमधून बारावीची परीक्षा दिली आणि डिस्टिंक्शन मार्क त्यांना मिळाले. शाळेत त्या पहिल्या आल्या. आपले पुढचे शिक्षण त्या सुरु ठेवणार आहेत. मानसशास्त्रात त्यांना पदवी मिळवायची आहे.

भाई सथ्था नाईट हायस्कुलने निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली असून यावर्षी कला शाखेचा निकाल ५५.५५ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ५३.१९ टक्के लागला आहे. कला शाखेत ५४ विद्यार्थी बसले होते, त्यातील ३० विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. ७०.५० टक्के गुण मिळवून बबिता साळवे पहिल्या आल्या. त्या खालोखाल रिमा मंगलारप ६६.६७ टक्के गुण मिळवून दुसऱ्या तर ६३.८३ टक्के गुण मिळवणाऱ्या मोहिनी काळे या तिसऱ्या आल्या. वाणिज्य शाखेत ४७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २५ उत्तीर्ण झाले. उषा कर्डीले प्रथम, गुंफा जावळे दुसऱ्या तर विशाल चित्रवकर तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि विद्यालयातील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष शिरीष मोडक, कार्याध्यक्ष अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ विश्वस्त अजित बोरा, शाळा समितीचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

माणूस हा आयुष्यभर शिकतच असतो. परिस्थितीमुळे ज्यांचे शिक्षण अर्धवट राहिले आहे त्यांनी वय झाले आहे म्हणून मागे न राहता भाई सथ्था नाईट हायस्कुलमध्ये प्रवेश घ्यावा आणि आपले शिक्षण पुढे चालू करावे. येथे इयत्ता ८ ते १२ वी प्रवेश सुरु आहेत. बबिता साळवे यांच्या यशाकडे पाहून प्रेरणा घ्यावी. त्यांना फॅशन डिझायनिंग या कोर्ससाठी 'मासूम' संस्थेने ४८००० रुपयांची शिष्यवृत्ती दिली. त्यांच्या निकषात त्यांचे वय बसत नव्हते तरी आपण विशेष प्रयत्न करून त्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळवून दिल्याचे प्राचार्य सुनील सुसरे यांनी आवर्जून नमूद केले. संस्थेच्या वतीने गुलाब पुष्प देऊन सुनील सुसरे यांनी बबिता साळवे यांचा सत्कार केला.

## तक्षिला स्कुलची यशस्वी निकालाची परंपरा कायम



सीबीएससी – २०२४ यावर्षी घेतलेल्या इ. १० वी व १२ वी परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी–विद्यार्थिनी. समवेत प्राचार्या सौ. जयश्री मेहेत्रे, इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी.

नगर – सीबीएसईने २०२४ या वर्षी घेतलेल्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले असून त्यात अहमदनगर मधील जामखेड रोडवरील तक्षिला विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवून शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली असल्याची माहिती प्राचार्या सौ.जयश्री मेहेत्रे यांनी दिली.

तब्बल २६ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले तर २७ विद्यार्थ्यांनी ८० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून यश संपादन केले आहे. यामध्ये आरुष पुप्पल या विद्यार्थ्याने ९७.६०% गुण मिळवत प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळवला तर अखिलीस अनारसे आणि विशुध्दी पानपाटील ९५.८०% गुण मिळवत द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले. तसेच अथर्व सानप याने ९५.६०% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. आरुष पुप्पल याने गणितामध्ये शंभर पैकी शंभर गुण मिळवून तर स्नेहा दळवी या विद्यार्थिनीने मराठी विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळवून घवघवीत यश मिळवले.

इयत्ता बारावीमध्ये वाणिज्य शाखेच्या अंजली गवांदे हिने ८७.६०% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला तर तनिष्का बिसेन हिने ८०% गुण मिळवत आणि संस्कार निंबाळकर ७६ टक्के गुण मिळवत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले. विज्ञान विभागात सानिका मेहेत्रे या विद्यार्थिनीने ८१.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली तसेच सुजल पिंपरकर ८१.२०% गुण मिळवून द्वितीय तर रेहान शेख ७४.२० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेसह इतर कौशल्य प्राप्त करून आत्मविश्वासाने जागतिक स्पर्धेत उतरावे व नावलौकिक प्राप्त करावा या हेतूने तक्षिला विद्यालय अविरतपणे प्रयत्नशील असल्याचे प्राचार्या सौ.मेहेत्रे म्हणाल्या. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे शाळा व्यवस्थापन पदाधिकारी, प्राचार्या, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## अशोक इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा शंभर टक्के निकाल

### श्रावणी औताडे हिने पटकावला प्रथम क्रमांक



श्रावणी औताडे



प्राजक्ता शिंदे



श्रावणी उंडे

नगर – अशोक इंग्लिश मिडीयम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, कॉमर्स ॲण्ड आर्टसचा बारावी बोर्डाचा निकाल शंभर टक्के लागला. यात श्रावणी नितीन औताडे (७२.५० %) हिने प्रथम, प्राजक्ता बाबासाहेब शिंदे (७०.५० %) द्वितीय, तर श्रावणी संजय उंडे (६९.५० %) हिने तिसरा क्रमांक मिळविला.

या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य संपत देसाई, प्रा.प्रतिभा तागड, प्रा.गणेश हाळनोर, प्रा.सागर कोकणे, प्रा.मधुरा कुंदे, प्रा.रुपाली शिरसाठ, प्रा.कविता राजुळे, प्रा.स्वाती वाबळे, प्रा.सुजाता डावखर, प्रा.अक्षय सोनवणे यांच्यासह सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी आ.भानुदास मुरकुटे, व्हा.चेअरमन पुंजाहरी शिंदे, अग्रो इंडस्ट्रीज अँड एजुकेशन फौंडेशनचे अध्यक्ष सोपानराव राऊत, उपाध्यक्ष बाबासाहेब आदिक, समन्वयक सौ. मंजुश्रीताई मुरकुटे, सचिव विरेश गलांडे, सहसचिव भास्कर खंडागळे तसेच कारखान्याच्या संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक

# विज्ञानवार्ता

## भारतीयांचं गायनप्रेम

संगीत ही केवळ एक कला नसून, त्यापलीकडेही काही तरी त्यामध्ये निश्चितच आहे. भारतात नादब्रह्माची उपासना प्राचीन काळापासूनच होत आलेली आहे. खरे तर भारतीय अभिजात संगीताचा उगमच सामवेदापासून झालेला आहे. अर्थातच, भारतीयांना संगीत केलेची आवाड प्राचीन काळापासूनच आहे.



आजही संगीत, गाणी ऐकणारे अनेक लोक आपल्या देशात पाहायला मिळतील. जगाचा विचार केला तर अन्य देशातील लोकांच्या तुनलेत भारतीय लोक सरासरी पाच तास अधिक गाणी ऐकतात, असे एका नव्या पाहणीतून दिसून आले आहे. आपण भारतीय लोक दर आठवड्याला सरासरी २५.७ तास गाणी ऐकतो. जगातील ही सरासरी वीस तासांची आहे. याचा अर्थ जगाच्या तुलनेत आपण दर आठवड्याला पाच तास अधिक वेळ गाणी ऐकण्यासाठी देत असतो. देशातील ६३ टक्के आणि जगातील ६९ टक्के लोक मानतात की, गाणी ऐकल्याने मानसिक आरोग्य चांगले राहते.

७० टक्के लोकांनी म्हटले आहे की, ते व्यायाम करीत असताना गाणी ऐकतात. त्यापैकी ८८ टक्के लोक रनिंगवेळी, ८३ टक्के लोक योगासने करीत असताना आणि ७३ टक्के लोक सायकलिंग करीत असताना गाणी ऐकतात. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फोनोग्राफिक इंडस्ट्रीने भारत-चीनसह २२ देशांमधील ३४ हजार लोकांची पाहणी करून 'एंगेजिंग विथ म्युझिक' नावाचा हा रिपोर्ट बनवला आहे. त्यानुसार २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये जगातील म्युझिक इंडस्ट्री ८ टक्के आणि भारताची १३ टक्क्यांनी वाढू शकते.

## आढळला हिटलरचा सोन्याचा खजिना!

पोलंडमध्ये खजिना शोधणाऱ्या एका पथकाला ॲडॉल्फ हिटलरचे असे रहस्य सापडले, ज्याची आजवर कोणालाच कल्पना नव्हती. दुसऱ्या युद्धादरम्यान, नाजी सेनेशी संबंधित एका बंकरमध्ये हा खजिना हाती लागला असून, याची चोरी हिटलरने केली होती, असे मानले जाते.

मामेरकी बंकरमध्ये खोदकाम करत असताना हा सोन्याचा खजिना मिळाला. आश्चर्याची बाब म्हणजे, रेल्वे ट्रॅकच्या खाली ५ फूट खोलवर हा खजिना लपवण्यात आला होता. जॅक्विज हिस्टोरिकल ॲंड एक्सप्लोरेटरी असोसिएशनने हा दुर्मिळ शोध लावला.


असोसिएशनचे एक पथक पोलंडमधील मामेरकी बंदरात खोदाई करत असताना या खजिन्याचा सुगावा लागला. ब्रिटिश माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, हिटलरने युद्धादरम्यान चोरलेला खजिना रेल्वेच्या ट्रकखाली लपवला होता. या पथकाने वार्मिया आणि माजुरी प्रांतात जमिनीच्या खाली पाच फूट खोदले असून, ही जागा हिटलरच्या बंकरपासून काही मैल अंतरावर जर्मन सेना कमांड हेडक्वॉर्टर स्थित आहे. मामेरकी संग्रहालयाचे प्लेबन्स्की यांनी सोशल मीडियावर या नव्या शोधासंदर्भात माहिती दिली.



## शनीच्या चंद्रावर आढळले मीठ!

शनीच्या शंभरपेक्षाही अधिक चंद्रांपैकी टायटन, एन्सिलाडस यांच्यासारख्या काही मोठ्या आणि बर्फाळ चंद्रांकडे खगोलशास्त्रांचे विशेष लक्ष असते. या चंद्रांवरी बर्फाळ पृष्ठभागाखाली महासागर लपलेले आहेत असे अनेक संकेत मिळालेले आहेत.

त्यामुळे तिथे जीवसृष्टीलाही पोषक स्थिती असावी असा अंदाज आहे. एन्सिलाडस या अशाच बर्फाळ चंद्रावर आता खगोलशास्त्रांना जीवसृष्टीला पोषक घटकाचा शोध लागला आहे. संशोधकांच्या एका आंतरराष्ट्रीय पथकाने एन्सिलाडसच्या महासागरावर असलेल्या बर्फाच्या जाड स्तरात सोडियम फॉस्फेटचा छडा लावला आहे. अशा मिठाचा पृथ्वीवर कधी कधी मुलायम मांसामध्ये वापर होतो.



अर्थात याचा अर्थ असा नव्हे की शनीच्या या चंद्रावर कुणी तरी मांस शिजवत आहे! मात्र फॉस्फेटस् हे भूविज्ञान तसेच जीवशास्त्रामधीलही एक महत्त्वाचे रसायन आहे. तसेच खगोलशास्त्रांना अन्य खगोलांवरील महासागरांबाबतही नेहमीच कुतुहल वाटत आले आहे. याचे कारण म्हणजे पाणी हे जीवसृष्टीसाठी 'जीवन'च आहे. ही जीवसृष्टीवी एक मूलभूत गरज आहे. जर अन्य ग्रह, चंद्रांवर असे पृथ्वीवरील समुद्रांप्रमाणेच मीठ आणि जैविक रेणू असलेले समुद्र असतील तर तिथेही जीवसृष्टीची शक्यता असू शकते. मात्र, विविध चंद्रांवरील अशा आच्छादित महासागरांचा अभ्यास करणे कठीण असते. याचे कारण म्हणजे त्यांच्या पृष्ठभागावर बर्फाचा अत्यंत जाड स्तर असतो. मात्र, एन्सिलाडसवर वारंवार उद्रेकही होत असतात आणि त्यामुळे आतील घटक पृष्ठभागावर येत असतात. अशा घटकांचा छडा 'नासा'च्या कॅसिनी यानानेही लावलेला आहे. हे यान शनी आणि त्यांच्या चंद्रभोवती तेरा वर्षे भ्रमण करीत होते.

## प्राणीप्रेमी ब्युटीक्वीन

आपल्या अवतीभवती अशा बऱ्याच कन्या, सौंदर्यतारका असतात, ज्यांना आपल्या लूकची सर्वाधिक काळजी असते. काही कन्या अशाही असतात, ज्यांना आपल्या लूकशी काहीही देणेघेणे असत नाही. २० वर्षीय रिहाना कार्टियर मात्र यापेक्षा खूपच वेगळी असून तिचे वैशिष्ट्य असे की, तिने आपले सारे बालपण जनावरांमध्ये, प्राण्यांमध्ये व्यतित केले आणि त्यानंतर अचानक ती ब्युटी क्वीन म्हणून नावारूपास आली. ब्युटी क्वीन झालेली रिहाना काही कालावधीपूर्वी अशी अजिबात नव्हती. डेली स्टारने दिलेल्या वृत्तानुसार, रिहाना पूर्वी छोट्याशा प्राणीसंग्रहालयात रहायची. तिचे बालपण जंगली आणि पाळीव प्राण्यातच व्यतित झाले. एरवी लहान मुलांचे बालपण असे व्यतित होत नाही, पण रिहानाला आवड असल्याने ती इकडे वळली.

रिहानाला प्राण्यांशी मैत्री करण्याचे, त्यांच्याशी हितगुज साधण्याचे गुण तिच्या आईकडून मिळाले. तिची आई १५ वर्षांची असल्यापासून प्राणीसंग्रहालयात रहायची आणि तोच कित्ता रिहानाने देखील गिरवला. रिहानाचेही सारे बालपण प्राणीसंग्रहालयात व्यतित झाले.

कॉटसवोर्ल्डस येथे राहणारी रिहाना प्राणी संग्रहालयात असताना सकाळी ६ वाजता उठून प्राण्यांना अन्न द्यायची. आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करत असताना तिला हा लळा लागला होता. त्यानंतर अचानक तिने मॉडेलिंगकडे वळण्याचा आश्चर्यकारक निर्णय घेतला आणि १६ व्या वर्षी तिने तिकडे मोर्चा वळवला. पुढे तिला मिस इको स्पर्धेत फायनलिस्ट म्हणून संधी मिळाली आणि आता ती युकेमधील मिस अर्थ स्पर्धेत भाग घेत आहे. या स्पर्धेत यश मिळाल्यास मिळालेल्या बक्षीस रकमेचा प्राण्यांसाठी विनियोग करण्याचा तिचा मानस आहे.





## 'घरपोच' रेल्वेसेवा

एखाद्या इमारतीला छेद देऊन रोज प्रवास करणारी रेल्वे आपण निश्चितच पाहिली नसेल. क्षणभर विचार करायला लावणारी ही संकल्पना आहे. पण, चीनमध्ये हे शक्य देखील झाले असून या तंत्राने सर्वांनाच थक्क करून टाकले आहे.

चीनमधील एका १९ मजली इमारतीतून चक्क रेल्वेसाठी ट्रॅक तयार केला गेला असून आश्चर्य म्हणजे ही इमारत निवासी संकुल आहे आणि तरी ही इमारत जणू रेल्वे स्टेशनप्रमाणेच झाली आहे. मुळातच, चीनमधील रेल्वे सिस्टीम अतिशय जबरदस्त आहे. तेथे एका १९ मजली इमारतीत सहाव्या आणि आठव्या मजल्यावरून रेल्वे रोज जाते. आता जगासाठी हे आश्चर्य असले तरी चीनमध्ये वर्षांनुवर्षे या मार्गावरून ट्रेन रोज धावत आहे. इमारतीमधून जाणारा रेल्वे ट्रॅक चीनमधील माउंटेन सिटी चंकिंगमध्ये आहे. या शहरात बहुतांश इमारती टोलेजंग असून तेथे जागेची कमी आहे. उंचावर रेल्वे ट्रॅक तयार करताना देखील १९ वा मजला आड आला आणि यावर मार्ग काढण्यासाठी तेथील अभियंत्यांनी चक्क बिल्डिंगमधून ट्रॅक निर्माण करण्याचा फंडा काढला अन् ते यात यशस्वी देखील झाले. आता रेल्वे इमारतीतून जाणार म्हणजे त्याचा आवाज तर येणारच. पण, यावरही उपाय करत चीनने सायलेन्स टेक्नॉलॉजीचा अवलंब केला. आता या ट्रेनचा तिथे आवाजच येत नाही. आश्चर्य म्हणजे या इमारतीत राहणाऱ्या वेगवेगळ्या मजल्यावरील लोकांना वेगवेगळे स्टेशन मिळतात. चीन अलीकडे हायटेक रेल्वेचा बराच विस्तार करत असून जगातील पहिले ट्रॅकलेस चीमध्येच प्रत्यक्षात साकारले गेले आहे. इमारतीतून प्रवास करणारी ही रेल्वेही अर्थातच लक्षवेधी ठरत आली आहे.

## शाश्वत इंटरनेटसाठी...

'नासा'ने संभाव्य इंटरनेट सर्वनाश रोखण्यासाठी प्रयत्नाचा एक भाग म्हणून अंतराळ यान लॉंच केले आहे. अमेरिकन अंतराळ एजन्सी पार्कर सोलर प्रोबने पीएसपी सौर हवेच्या माध्यमातून नेविगेट करण्यासाठी महत्त्वापूर्ण योजना आखली आहे. संशोधकांनी आगामी सौर तुफानाच्या संभाव्य प्रभावाबद्दल इशारा दिला असून, याला प्रामुख्याने इंटरनेट सर्वनाश असे संबोधले जाते. पुढील दशकभरात हा धोका संभवतो. २०१८ मध्ये लॉंच केले गेलेले अंतराळ यान सूर्याच्या नजीक असून, तेथेच सौर हवेची निर्मिती होते.



मिळालेल्या वृत्तानुसार, सौर हवेत सूर्याच्या बाहेरील वातावरणातून आवेशित कणांची एक धारा निघत असते. त्याला कोरोना असेही म्हटले जाते. प्रचंड उष्णता आणि विकिरणांच्या प्रतिकूल परिस्थितीतही पार्कर सोलर प्रोब सूर्याच्या कार्यप्रणालीबाबत महत्त्वाची माहिती एकत्रित करत राहिला आहे.

कॅलिफोर्निया विद्यापीठातील प्रा. स्टुअर्ट बेल यांनी सौर हवेचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, सूर्याची बरीच माहिती हवा पृथ्वीपर्यंत घेऊन जात असते. यामुळे सूर्याच्या हवेमागील मंत्र समजावून घेणे पृथ्वीवरील व्यावहारिक कारणामुळे महत्त्वाचे ठरते. सूर्य ऊर्जा कशी प्रदान करतो आणि भू-चुंबकीय तुफान कसे चालते, हे पाहिले तर लक्षात येईल की, आपल्या संचार नेटवर्कला धोका आहे. अशा घटनांमुळे कित्येक महिने किंवा कित्येक वर्षे इंटरनेट बंद होऊ शकते. शिवाय, उपग्रह, विजेच्या लाईन खराब होऊ शकतात. यादरम्यान, 'नासा'ने नवे मिशन सुरू केले असून, त्यात पुढील वर्षी 'नासा'चे युरोपा क्लीपर यान आगेकूच करेल. हे यान ऑक्टोबर २०२४ मध्ये गुरू आणि चंद्राच्या दिशेने झेपावणार आहे.

## कर्करोगावर रामबाण उपाय सापडला?

कर्करोगावर रामबाण उपाय शोधल्याचा दावा इस्त्रायलने केला आहे. जेरूसलेममधील हदासाह युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटरमधील संशोधकांनी याबाबतचे संशोधन केले आहे. जेरूसलेमच्या ऐन केरेमनी जाहीर केले आहे की मल्टिपल मायलोमा कॅन्सरच्या उपचारात अभूतपूर्व यश मिळाले आहे. हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वसामान्य हेमेटोलॉजिकल आजार आहे जो रक्ताच्या कर्करोगाचा दहावा हिस्सा आहे. तसेच प्रत्येक प्रकारचय कर्करोगाचा तो एक टक्के भाग असतो. कर्करोगाला आजही एक जीवघेणा आजारच मानला जातो.

युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटरमधील पोलिना स्टेपेंस्की यांनी सांगितले की 'सीएआर-टी ट्रिटमेंट'चे प्रभावशाली निष्कर्ष पाहून असे वाटते की कर्करोगाच्या रूग्णांचे आयुष्य आता आणखी वाढवता येऊ शकते. हे रूग्ण एक चांगले जीवन जगू शकतील. या नव्या उपचाराचे प्रयोग हॉस्पिटलच्या बोन-मॅरो ट्रान्सप्लांट आणि इम्युनोथेरेपी विभागात करण्यात आले आहेत. ही नवी उपचार पद्धत जेनेटिक इंजिनिअरिंगच्या तंत्रावर आधारित आहे. हे एक तंत्र आहे जे कर्करोगाच्या अशा रूग्णांसाठी प्रभावी आहे ज्यांचे आयुष्य काही वर्षांपूर्वी केवळ दोन वर्षांचेच सांगितले जात असे.

डॉक्टरांनी एआर-टी किंवा चिमेरिक ॲंटिजेन रिसेप्टर टी-सेल थेरेपी नावाच्या जेनेटिक इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजीचा प्रयोग केला. हे तंत्र कर्करोगाला नष्ट करण्यासाठी रूग्णाची रोगप्रतिकारक क्षमता मजबूत करते. ऑन्कोलॉजिस्टनी म्हटले की हदासाहमध्ये उपचार केलेल्या ७४ रूग्णांपैकी ९० टक्क्यांपेक्षा अधिक रूग्ण पूर्णपणे बरे झाले. सीएआर-टी टेक्नॉलॉजी उपचाराला आणखी सोपे बनवू शकते. त्यामुळे कर्करोगावर प्रभावी उपचार करता येणे शक्य आहे. मल्टिपल मायलोमा हा बोनमॅरोचा एक विशिष्ट प्रकारचा कर्करोग आहे. तो सर्व साधारणपणे कवटी, पेल्विस, फासळ्या आणि मणक्यासह शरीराच्या अनेक भागांना प्रभावित करतो.





## धूम रिॲलिटी हेडसेटची


अनेक कंपन्या अद्ययावत अशी उपकरणे बनवत आहेत. आता ॲपल डब्ल्यूडब्ल्यूडीसी २०२३ मध्ये कंपनीने आपला पहिला मिक्स्ड रिॲलिटी हेडसेट लॉंच केला आहे. याला 'ॲपल व्हिजन प्रो' असे नाव देण्यात आले आहे. हा हेडसेट डोक्यात घातल्यावर आणि डोळ्यांवर घातल्यावर वापरकर्त्यांसमोर एक स्क्रीन सादर करतो. ज्यामध्ये प्रत्येक लहान-मोठे काम केले जाते. मनोरंजन ते गेमिंगपर्यंत यामध्ये चांगला अनुभव मिळतो. 'व्हिजन प्रो'ला डोळे आणि आवाजाने नियंत्रित केले जाऊ शकते असे कंपनीचे म्हणणे आहे.

याबाबतचे वृत्त 'गॅजेटस् ३६०'ने दिले आहे. 'ॲपल'ने जेव्हा 'व्हिजन प्रो'ची घोषणा ऐकली तेव्हा तिथे उपस्थित असणाऱ्या माध्यमांना कंपनीने आश्चर्यचकित केले. यामधले 'आयसाईट' हे एक असे फिचर आहे जे कोणी हे व्हिजन प्रो डोळ्यांवर हेडसेट घालते, तेव्हा ज्याने कोणी घे घातले आहे त्याच्यासह खोलीमध्ये कोणी आहे का शोधण्यासाठी डिव्हाईसच्या चारही बाजूंनी कॅमेरा सेन्सरचा वापर करते. 'व्हिजन प्रो'मध्ये अनेक फिचर्स आहेत.

दृश्य स्पष्टपणे दिसण्यासाठी मायक्रो 'ओएलईडी' डिस्प्ले, पॉवरसाठी एम २ चिप आणि हाताचे इशारे आणि नियंत्रणासाठी आवाजासह काम करेल असे अनेक कॅमेरे, सेन्सर आणि मायक्रोफोन यामध्ये मिळतात. वापरकर्ते व्हिजन प्रोमध्ये काही कामासाठी कीबोर्ड आणि माऊसचा देखील वापर करू शकता. व्हिजन प्रो बायोमेट्रिक्ससाठी तुमच्या डोळ्यांमधील रेटिना स्कॅन करण्यासाठी ऑप्टिक आयडीचा वापर करते आणि तुम्हाला हेडसेटमध्ये लॉग इन करता येते. हे सर्व 'व्हिजनओएस'सह काम करते.

## प्राचीन भाषेचा 'कृत्रिम' अनुवाद

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' किंवा 'एआय' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमतेच्या सहाय्याने सध्या अनेक थक्क करणारी कामे केली जात आहेत. आता इस्त्रायलमध्ये 'एआय'च्या मदतीने एक असा प्रोग्रॅम विकसित करण्यात आला आहे ज्याच्या सहाय्याने अक्कादियन क्युनिफॉर्म लेखनाचा अनुवाद करता येऊ शकेल. या प्रोग्रॅमच्या मदतीने पुरातन लेखन प्रणालीस समजणे सोपे होईल तसेच तिचा अनुवादही करता येऊ शकेल.



क्युनिफॉर्म लेखन ही मातीच्या पाट्यांवरील अंकन लिपी आहे. खिळ्याच्या आकाराच्या प्रतिकांचा यामध्ये कोरीव स्वरूपात वापर केला जातो. जगभरातील काहीच तज्ज्ञ या चिन्हांना 'डिकोड' करू शकतात. मात्र, आता ही प्रक्रिया अधिक सोपी होऊ शकते. इस्त्रायलच्या पुरातत्त्व संशोधक आणि कॉम्प्युटर वैज्ञानिकांनी प्राचीन अक्कादियन क्युनिफॉर्मसाठी एआय-संचालित ट्रान्सलेशन प्रोग्रॅम विकसित केला आहे. त्याच्या मदतीने एका क्लिकमध्येच तिला इंग्रजीत अनुवादित करता येऊ शकेल. सोप्या शब्दात सांगायचे म्हणजे 'एआय'च्या सहाय्याने आता पाच हजार वर्षांपूर्वीच्या लेखन प्रणालीसह अनुवादित करता येणे शक्य झाले आहे.

जागतिक स्तरावर अनेक ग्रंथालय, संग्रहालय आणि विद्यापीठांमध्ये क्युनिफॉर्मसह कोरलेल्या मातीच्या पाट्या पाच लाखांहून अधिक आहेत. असा मजकूर भरपूर आहे आणि त्याचे जाणकार कमी आहेत. अक्कादियन क्यूनिफॉर्मही वाचता येणारे मोजकेच लोक आहेत. ही भाषा गेल्या दोन हजार वर्षांमध्ये कुणी बोलली किंवा लिहिलेली नाही. त्यामुळे या टॅबलेटसचा केवळ एक छोटाच भाग आतापर्यंत अनुवादित झालेला आहे. आता तेल अवीव विद्यापीठातील संशोधकांच्या प्रयत्नाने ही लिपी उलगडता येऊ शकेल. अक्कादियन ही मेसोपोटामिया आणि मध्य-पूर्वेत इसवी सनपूर्व ३००० ते इसवी सन १०० पर्यंत लिहिली आणि बोलली जात होती. त्यावेळेची ही एक लोकभाषा होती.



## चक्क गोलाकार अंडे!

अंडे हे 'अंडाकार'च असते हे आपल्याला माहिती आहेच! मात्र निसर्गही कधी कधी आपल्याच नियमांना अपवाद निर्माण करीत असतो कधी कधी पूर्ण गोलाकार अंडीही निर्माण होतात आणि ती लोकांचे लक्ष वेधून घेतात. आता ऑस्ट्रेलियाच्या एका सुपर मार्केटमधील अशाच गोलाकार अंड्याने सर्वांचे लक्ष वेदून घेतले. त्याच्या या आकारामुळेच त्याला अव्वाच्या सव्वा किंमत मिळू शकते!

ऑस्ट्रेलियाच्या मेलबोर्नमध्ये हे सुपरमार्केट आहे. तिथे हे गोलाकार अंडे आढळून आले. अशा अंड्याला 'वन इन ए बिलियन' अंडे म्हटले जाते. अर्थात अब्जावधी अंड्यांपैकी एखादेच असे गोल असते. एकदा अशा अंड्याला ७८ हजार रूपयांची किंमत मिळाली होती. आता या अंड्याची किंमतही अशीच असू शकते असा अंदाज आहे. पत्रकार जॅकलिन फेलगेट यांनी सोशल मिडियावरून या अंड्याची महिती दिली. त्यांनीच या अंड्याचा एक फोटोही शेअर केला. त्यांनी सांगितले की असे गोलाकार अंडे तुमच्याकडे असेल तर ते नीट सांभाळून ठेवा. त्याला चांगली किंमत मिळू शकते! अंड्याच्या कार्टनमध्ये आम्हाला असेच एक गोलाकार अंडे मिळाले.

## मेंदूची क्षमता जाणून घ्यायचीय?

आपल्याकडे पाहुणे घरात आले की लहान मुलांना 'तू मोठेपणी कोण होणार?' असे हटकून विचारत असतात. ही लहान मुलं आधी मोठी तर होऊ द्या, असे पालकांच्या मनात येत असते! मात्र मुलं मोठी झाल्यावर हा प्रश्न खरोखरच पुढे उभा राहतो. अर्थातच आपले अपत्य कोणत्या क्षेत्रात करिअर करणार हे त्याच्या बौद्धिक कुवतीवरच अवलंबून असते याची पालकांनाही कल्पना असतेच. आता त्यासाठी एक मशिनही तयार करण्यात आले आहे. मौलाना आझाद नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने तयार केलेल्या या ब्रेन मॅपिंग विशेष सॉफ्टवेअर मशिनद्वारे केवळ वीस मिनिटांतच एखाद्या व्यक्तीच्या मेंदूची क्षमता समजू शकते.




आपल्या अपत्याची शिकण्याची किती क्षमता आहे हे जाणून घेण्यास यामुळे भविष्यात मदत मिळू शकेल असे संशोधकांना वाटते. याबाबत २०१७ पासून संशोधन सुरू होते. या सॉफ्टवेअरमुळे मुलांची क्षमता तपासण्यात मदत होईल. मध्य प्रदेशातील सात हजार लोकांवर या तंत्राचा वापर करण्यात आला. त्यामध्ये कर्करोग, पक्षाघात, बायलोपर डिसऑर्डर अशा गंभीर समस्या असलेल्या लोकांचाही समावेश होता. त्यामुळे त्यांच्या समस्या सुटण्यास मदत झाली आहे. हे तंत्रज्ञान पाच वर्षांच्या मुलापासून ते ९० वर्षांच्या वृद्धापर्यंत काम करते. लहरींची माहिती अशी : अल्फा लहरी : मेंदूवरील नियंत्रण, विचारांमधील संतुलन किती आहे हे सांगते. बीटा लहरी : शिकण्याची, समजून घेण्याची क्षमता, स्मरणशक्तीबाबत सांगते. गमा लहरी : राग, मूड बदलणे, अस्वस्थता यासारखे विकार यामधून आढतात. थीटा लहरी : विचार प्रक्रिया करते, भावना स्पष्ट करते. डेल्टा लहरी, झोपेची गुणवत्ता, समाधान याबाबत सांगते.

## गूढ समुद्रातल्या सोन्याचं

समुद्राला आपल्याकडे 'रत्नाकर' असे म्हटले जाते. अनेक प्रकारची नैसर्गिक साधनसंपत्ती, मोती, मासे यांनी समुद्र संपन्न असतात. मात्र, समुद्रांमध्ये खरोखरचे सोनेही लपलेले आहे आणि ते अर्थातच जुन्या काळापासून समुद्रात बुडालेल्या जहाजांवरील आहे. अमेरिकन सरकारी विभाग 'नॅशनल ओशन सर्व्हिस'च्या म्हणण्यानुसार, समुद्राच्या तळामध्ये २० दशलक्ष टनपेक्षा जास्त सोने पडून आहे. त्याची किंमत सुमारे ८०० ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त असेल. हे सोनं इतकं आहे की त्यातून अमेरिकेसारखे अनेक बलाढ्य देश तयार होतील.

१६४१ मध्ये ब्रिटनचे रॉयल मर्चंट जहाज खराब हवामानामुळे कार्नवॉलजवळ पाण्यात बुडाले. या जहाजाचा वरचा भाग २०१९ मध्ये सापडला होता. परंतु, त्याचा उर्वरित भाग आजवर सापडलेला नाही. हे जहाज बुडाले तेव्हा त्याच्या तिजोरीत एक लाख पौंड सोनं होतं, असा अंदाज आहे.



पोर्तुगीज कार्गो फ्लोअर दे ला मेरने गुलाम देशांमधून सोने आणि मौल्यवान वस्तू गोळा करून पोर्तुगालला नेण्याचे काम जवळजवळ एक दशकापर्यंत केले. १६ व्या दशकाच्या सुरूवातीला पॅसिफिक महासागरात उपघात होऊन एक जहाज समुद्रात बुडाले होते. असा अंदाज आहे की त्यावेळी या जहाजात २ अब्ज डॉलर्स किमतीचे सोने ठेवण्यात आले होते. अशी एक दोन नाही तर हजारो जहाजं समुद्राच्या तळाशी असतील. नॅशनल ओशनिक ॲण्ड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशननुसार, समुद्रात किती सोने किंवा मौल्यवान वस्तू आहेत हे सांगणे कठीण आहे. बहुतेकदा ते मोठ्या बुडलेल्या जहाजांच्या आधारे मोजले जाते. पण असे मानले जाते की हे सोनं इतकं जास्त असेल की त्याच्या किमतीत अनेक नवे आणि शक्तीशाली देश तयार होऊ शकतात.





सुगाव घटनेत मृत झालेल्या एस.डी.आर.एफ जवानांना पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तर या घटनेप्रकरणी रास्ता रोको आंदोलन करणाऱ्या आंदोलकांशी चर्चा करताना पालकमंत्री.

# मयत जवानांच्या कुटूबियांना दहा लाखांची मदत

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती**

अकोले – सुगाव घटनेत मृत झालेल्या एस.डी.आर.एफ जवानांच्या कुटूबियांना दहा लाख रुपयांची मदत देण्यात येणार असल्याची माहीती महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

प्रवरा नदीपात्रात मृत झालेल्या तरुणाचा मृतदेह शोधण्यासाठी स्थानिक प्रशासनाने एस.डी.आर.एफच्या पथकाला पाचारण केले होते. सुगाव येथे पथक दाखल झाल्यानंतर त्यांनी शोधकार्य सुरू केले मात्र पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने या पथकातील पी.एस.आय प्रकाश नाना शिंदे, कॉन्स्टेबल राहुल गोपीचंद पावरा, वैभव सुनिल वाघ यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेने प्रशासन हादरले, ग्रामस्थांच्या मदतीने या तीन जवानांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. यापैकी पंकज पंढरीनाथ पवार, अशोक हिम्मतराव पवार यांना पुढील उपचाराकरीता स्थानिक रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेचे वृत्त समजल्यानंतर ना.विखे पाटील यांनी महसूल आणि पोलीस प्रशासनास सूचना देवून मृत जवानांच्या कुटूबियांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना दिल्या. दुपारी पालकमंत्री विखे पाटील, माजी आ.वैभव पिचड, राज्याच्या पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला, विशेष पोलीस महानिरीक्षक बी.जी.शेखर, जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्यासह महसुल व प्रशासनातील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

मृत जवानांच्या पार्थिवावर मंत्री विखे पाटील आणि वरीष्ठ अधिकाऱ्यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली वाहिली. पोलीस पथकाने शोकधून आणि बंदूकीची सलामी देवून मृतदेह त्यांच्या गावी रवाना करण्यात आले. याप्रसंगी जवानाचे नातेवाईक आणि त्याच्या सहकाऱ्यांना भावना आवरणे अवघड झाले होते. या सर्वांना मंत्री विखे पाटील यांनी दिलासा दिला.

या सर्व जवानांच्या कुटूबियांना १० लाख रुपयांची मदत करण्यात येणार असल्याची माहिती ना.विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. घडलेली घटना दुर्दैवी असून, सर्व मृतदेह नातेवाईकांकडे रवाना करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. पाण्यामध्ये बुडालेल्या अन्य दोन व्यक्तिंचा तपास करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येत असून, धरणातून पाण्याचा प्रवाहही आता बंद करण्यात आला आहे. याच कारणासाठी युवकांनी केलेल्या रस्ता रोको आंदोलनासही मंत्री ना.विखे पाटील यांनी भेट दिली. घटना घडल्यानंतर पाण्याचा प्रवाह कमी करण्याच्या सुचना आपण यापुर्वीच दिल्या होत्या परंतू आंदोलकांच्या भावना लक्षात घेवून संपूर्ण प्रवाहच बंद करण्याच्या सुचना जलसंपदा विभागाला त्यांनी दिल्या.

# भ्रष्टाचारी सरकारी नोकरांविरोधात होणार ढब्बू मकात्या डिच्चू कावा गॅझेट प्रसिद्ध

**लोकभज्ञाक चळवळीचा पुढाकार; जनतेच्या माध्यमातून दबावतंत्र निर्माण करण्याचा प्रयत्न**



नगर – सरकारी नोकरीतून टेबलाखालून कमाई करणारे भ्रष्टाचारी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाणीव नसलेल्यां विरोधात लोकभज्ञाक चळवळीच्या वतीने ढब्बू मकात्या डिच्चू कावा गॅझेट प्रसिद्ध केले जाणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

यापुढे सरकारी नोकरीतून पगार, त्याशिवाय टेबलाखालून कमाई व मरेपर्यंत पेन्शन या गोष्टी काम न करता चालू शकणार नसल्याचे लोकभज्ञाक चळवळीच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. लोकांबाबतची भक्ती, लोकांच्या प्रश्नांचे ज्ञान आणि ते सोडवण्याचे तंत्र त्याशिवाय खऱ्या अर्थाने लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्य सरकारी नोकरदारांना करावे लागणार असून, यासाठी जनतेच्या माध्यमातून दबावतंत्र निर्माण केले जाणार आहे.

सरकारी नोकरी म्हणजे सोन्याचं अंड देणारी कोंबडी आहे आणि मरेपर्यंत सरकारी नोकरीचा फायदा होतो, असा गैरसमज स्वातंत्र्योत्तर काळात ७५ वर्ष टिकून राहिला. सरकारी नोकरी ही आपण देत असलेल्या सेवेबाबतचा मेहनताना मिळण्यासाठी आणि त्यातून कुटुंब चालविण्यासाठी कायद्याने निर्माण केलेली यंत्रणा आहे. परंतु मोठ्या प्रमाणात सरकारी नोकर भ्रष्टाचार, अनागोंदी आणि टोलवाटोलवी यामध्ये गुंतून पडले आहे. फुकटच्या मलिद्यावर बायका, मुलांना पोसण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे संस्कारहीन पिढी तयार झाली आणि सरकारी नोकर हे ढब्बू मकात्या वर्गातील लोक पोसले गेले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

भ्रष्टाचारातून आणलेल्या पैश्यातून मुलांना पोसणे व त्यांचे लाड पुरविणे हे आई-वडिलांचे संस्कार मुलांवर अतिशय वाईट होतात. वाईट संस्कारातून घडलेली पिढी वृद्धापकाळी आई-वडिलांना वृद्धाश्रमाचा रास्ता दाखवतात. सजीवांमध्ये असणाऱ्या चैतन्याचे अलिखित नियम हजारो वर्षे भारतीयांना माहित आहेत. त्याला साध्या भाषेत पाप आणि पुण्य असे म्हटले जाते. परंतु हरामाचा पैसा खाणारा कोणीही आजपर्यंत सुखी झालेला नसल्याचे म्हंटले आहे.

भ्रष्टाचारी नोकरांविरोधात मोहिम यशस्वी करण्यासाठी अ‍ॅड. कारभारी गवळी, ओम कदम, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, शाहीर कान्हू सुंबे, विठ्ठल सुरम, अशोक भोसले आदी प्रयत्नशील आहेत.

# दोन मित्रांना मारहाण करत चाकूचा धाक दाखवत लुटले

**दौंड रस्त्यावरील कायनेटिक कंपनीसमोरील घटना; तिघांविरूध्द गुन्हा दाखल**

नगर – प्रवासादरम्यान लघुशंकेसाठी रस्त्याच्या कडेला थांबलेल्या दोन मित्रांना मारहाण करत चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना नगर-दौंड रस्त्यावरील कायनेटीक कंपनीसमोर ही घटना घडली.

लुटमार झालेले अक्षय मारूती नाडे (वय २५ मुळ रा. आझादनगर, बुरूडगाव, हल्ली रा. विद्यानगर, नगर दौंड रस्ता) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अनोळखी तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय व त्यांचा मित्र राहुल संजय कुऱ्हाडे हे बुधवारी (दि. २२) रात्री दुचाकीवरून नगर शहरातून घराकडे विद्यानगर येथे जात असताना साडेनऊच्या सुमारास रस्त्याच्या बाजूला मोकळ्या जागेत लघुशंकेसाठी थांबले असता तेथे तीन अनोळखी व्यक्ती दुचाकीवरून आल्या.

'हा एरिया कोणता आहे' अशी विचारणा करून काही एक कारण नसताना त्यांनी अक्षय व राहुल यांना शिवीगाळ, दमदाटी करून गळ्याला चाकू लावला. अक्षयच्या खिशातील रोकड व मोबाईल मोबाईल असा १७ हजार ३०० रुपयांचा ऐवज बळजबरीने काढून घेतला. मारहाणीत अक्षय व राहुल दोघे जखमी झाले आहेत. त्यांनी नातेवाईकाना फोन करून घटनास्थळी बोलून घेतले व कोतवाली पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी ३ अज्ञात इसमांच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ३९४, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# किर्गिझस्तानमधील भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षितरित्या आणि सुखरूप परत आणा

**आ. सत्यजित तांबे यांची परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांना पत्राद्वारे विनंती**



नगर – किर्गिझस्तानमध्ये पाकिस्तानसह भारतीय विद्यार्थ्यांवर होणाऱ्या वांशिक हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर आता आमदार सत्यजीत तांबे यांनी पुढाकार घेत भारतीय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी थेट परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांना पत्र पाठवले आहे. या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी महाराष्ट्रातील असून त्यांच्यासह सर्व भारतीय विद्यार्थ्यांना सुखरूप परत आणण्यासाठी भारताने प्रयत्न करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच किर्गिझस्तानच्या सरकारशी बोलून या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण घेता येईल का, याचीही चाचपणी करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

किर्गिझस्तानची राजधानी बिश्केकमध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या हिंसाचारात पाकिस्तानी आणि भारतीय विद्यार्थ्यांना लक्ष्य केले गेले. त्यानंतर या देशात वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या १० हजारांपेक्षा जास्त भारतीय विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. हे विद्यार्थी हॉस्टेलच्या बाहेर पडण्यासही घाबरत आहेत. तर अनेकांनी देश सोडून जाण्यासाठी थेट विमानतळ गाठले आहे. या विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राच्या नाशिक, छत्रपती संभाजीनगर, धाराशीव आणि बीड या जिल्ह्यांमधील ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

किर्गिझस्तानमध्ये अडकून पडलेल्या आणि हल्ल्याच्या भीतीने गर्भगळीत झालेल्या या विद्यार्थ्यांची सुरक्षा हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. हे विद्यार्थी उज्वल भविष्याची आशा घेऊन तिथे गेले आहेत. मात्र आता ते अडकून पडले असतील, तर त्यांना सुखरूप भारतात आणायला हवे. त्यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी पुढाकार घेऊन या विद्यार्थ्यांच्या परतीची व्यवस्था करावी, अशी मागणी मी पत्राद्वारे केली आहे, असे आ. सत्यजीत तांबे यांनी स्पष्ट केले.

आपल्या विद्यार्थी चळवळीच्या काळापासूनच विद्यार्थ्यांच्या व्यापक हितासाठी पुढाकार घेणाऱ्या आ. तांबे यांनी या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या बाबीकडेही जयशंकर यांचे लक्ष पत्राद्वारे वेधले आहे. जोपर्यंत किर्गिझस्तानमधील परिस्थिती पूर्ववत आणि भारतीय विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित होत नाही, तोपर्यंत तेथील विद्यापीठांनी भारतीय विद्यार्थ्यांसाठी हे अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने घ्यावेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. यासाठीही परराष्ट्र मंत्रालयाने प्रयत्न करावे, अशी मागणीही आ. तांबे यांनी केली आहे.

### हे विद्यार्थी म्हणजे देशाचे भविष्य!

किर्गिझस्तानमध्ये शिकणारे हे विद्यार्थी हुशार आहेत. देशाचे भविष्य घडवण्याची ताकद त्यांच्या मनगटांत आहे. आत्ता ते अडचणीत आहेत आणि त्यांना परत मायभूमीत आणणे, हे आपले कर्तव्य आहे. यासाठी माझ्या परीने जे करता येईल, ते सगळे मी करेन. परराष्ट्र मंत्र्यांना पत्र लिहून मी त्यांना परत आणण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांचे काही शैक्षणिक नुकसान झाले, तर ते कसे भरून काढता येईल, यासाठीच्या आराखड्याबाबतही आम्ही विचार करत आहोत, असे आ. सत्यजीत तांबे म्हणाले.






स्वामी शिवानंद दरबाराच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित सोहळ्यानिमित्त आयोजित शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. तर हरीहरेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान, केडगाव देवी आणि पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिरात डॉ. श्रीकांत चेमटे यांनी स्वामींचे स्वागत आणि सत्कार केला. याप्रसंगी शिवाजी लोंढे आदी.

# सद्गुरु स्वामी शिवानंद दादाजी परिवाराचा नगर शहरात २५ मे रोजी महारुद्र, महायज्ञ

**रक्तदान, आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरास प्रारंभ; स्वामींसोबत आद्य धुनी द्वारिका मैय्या, धनंजय सरकार यांची उपस्थिती**




नगर – केडगाव-सोनेवाडी रस्त्यावरील लोंढे मळा येथील स्वामी शिवानंद दरबाराच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित सोहळ्याला नंदनवन लॉन येथे २४ मे रोजी सुरुवात झाली. यानिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांसाठी रक्तदान, आरोग्य आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याला भाविकांचा प्रतिसाद मिळाला. सकाळी १० वाजता नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन येथे आद्य परम सदगुरु स्वामी शिवानंद दादा यांचे आगमन झाले. स्वामी शिवानंद दादाजी परिवाराच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. स्वामींसोबत आद्य धुनी द्वारिका मैय्या, धनंजय सरकार, सौ. सायलीताई, प्रियाताई उपस्थित होत्या.

वर्धापन दिनाच्या निमित्ताने या ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, स्वामी चरण पूजनानंतर त्यांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला. नंतर सौ. सायलीताई यांनी ज्ञान चर्चा केली. आपल्या आयुष्यात काहीच नको अशी वृत्ती ठेवा. लोभ नको, मोह टाळा, त्याग करा, सत्कर्माने वागा, कर्म करीत रहा, स्वामींची मनोभावे भक्ती करा, भक्तिरसात तल्लीन व्हा, ध्यानधारणा मनापासून केली, आपली कुंडलिनी जागृत केली तर ईश्वराच्या रूपात तुम्हाला स्वामी दर्शन देतील आणि तुमचे कल्याण होईल, अडीअडचणी संकटे दूर होतील, स्वामींची कृपादृष्टी सदैव तुमच्यावर राहील, असे ज्ञानदान त्यांनी केले.

त्यानंतर रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिराला नगरच्या जनकल्याण रक्त संकलन केंद्राने सहकार्य केले. १०० पेक्षा जास्त बाटल्या रक्त जमा झाले स्वामींनी फित कापून शिबिराचे उद्घाटन केले.

आरोग्य तपासणी शिबीर मनपा, जिल्हा रुग्णालय आणि बीव्हीजी ग्रुपच्या १०८ क्रमांक रुग्णवाहिका यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. त्याला भाविकांचा चांगला प्रतिसाद लाभला. यावेळी भाविकांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना उपचाराचा सल्ला देण्यात आला. नंतर नेत्र शिबिराचे उद्घाटन स्वामींनी केले. हरीहरेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान, केडगाव देवी आणि पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन दादाजी परिवाराच्या साधकांसाठी करण्यात आले होते. हरिहरेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत चेमटे यांनी स्वामींचे स्वागत आणि सत्कार केला. यावेळी रुग्णांची नेत्र तपासणी करून त्यांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. मोतीबिंदू, काचबिंदू असलेल्या रुग्णांची यादी करून त्यांना पुढील मोफत शस्त्रक्रियेसाठी पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयात पाठविण्याचे वेळापत्रक देण्यात आले. या शिबिराला देखील साधकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

वर्धापन दिनाच्या निमित्ताने या ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, राज्यभरातून आलेल्या भाविकांच्या निवास व भोजनाची व्यवस्था या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

२५ मे रोजी नंदनवन लॉन शेजारील सरस्वती सभागृह येथे विश्वकल्याणासाठी महारुद्र महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या महायज्ञात १०८ साधक आहुती देतील. यज्ञासाठी लागणाऱ्या साहित्यामध्ये गणेश मूर्ती, शिवलिंग, कलश, ताट- ताम्हण, पळी-पेला, तांब्या, आसन आणि हवन सामग्री साधक स्वतः आणणार आहेत. नगर शहर आणि परिसरातील भाविकांनी यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीचे प्रमुख बबन खेडकर, शिवाजी लोंढे यांनी केले आहे.

आद्य स्वामींचे भव्य स्वागत आणि पूजन झाल्यानंतर आद्य स्वामींचे ज्ञानदान हवन, भजन, सत्संग आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. याशिवाय याच दिवशी रात्री दहा ते अकरा दरम्यान महाप्रसादाचा आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजकांमार्फत देण्यात आलेली आहे.

या महोत्सव यशस्वी करण्यासाठी आद्य परम सद्गुरू स्वामी शिवानंद दादाजी, परमपूज्य माऊली माताजी, आद्य धुनी द्वारिका मैय्या, धनंजय सरकार, सौ. सायलीताई, प्रियाताई यांच्या निर्देशानुसार बबन खेडकर, शिवाजीराव लोंढे, अमोघ नलगे, निवृत्ती लोंढे, उत्तम चौधरी, सुभाष लोंढे, बबन बारहाते, भास्कर कापरे, कैलास कारले, जगन्नाथ जाधव, संजय डहाळे, सुरेश कुडाळ, संदेश कार्ले, मुळे सर, दुसुंगे मेजर, विलास जाधव, प्रवीण कोल्हे, पुलावळे काका, गावडे काका, गाडेकर काका, झाडे काका, योगेश मेहेर, प्रफुल्ल जगरवाल, विलास जाधव, निलेश कापरे, शेखर कुलकर्णी, विठ्ठल गुंजाळ, कुमावत काका, सागर जाधव डॉ. दीपक कांबळे, आदित्य लोंढे, बाळासाहेब जाधव, नानाजी पगारे, अशोक कोठावदे आदी प्रयत्नशील आहेत.

# निसर्ग स्वातंत्र्य रक्षा लढा अधिक व्यापक करण्यासाठी वकील संघटनेचा प्रयत्न

**पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्नशील असणाऱ्यांना निसर्ग रक्षा सैनिक म्हणून दिली जाणार मानवंदना**



नगर – निसर्गाला ग्लोबल वॉर्मिंगच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी अहमदनगर वकील संघाने पुढाकार सुरु ठेवला असून, निसर्ग स्वातंत्र्य रक्षा लढा अधिक व्यापक करण्यासाठी वकील संघटनेचा प्रयत्न सुरु आहे. पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणाऱ्यांना निसर्ग रक्षा सैनिक म्हणून ११ जूनच्या कार्यक्रमात मानवंदना दिली जाणार असल्याची माहिती अहमदनगर वकील संघाचे उपाध्यक्ष अ‍ॅड. महेश शेडाळे व अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

स्वातंत्र्य लढ्यात हजारो वकिलांनी मोठी काम गिरी केली, त्याची पुनरावृत्ती निसर्ग स्वातंत्र्य लढा सुरू करून अहमदनगर वकील संघाने सुरू ठेवली आहे. ११ जून रोजी प्रधान जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणाऱ्या कार्यक्रमात वकील संघाचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. भूषण बऱ्हाटे, अ‍ॅड. राजेश कावरे, अ‍ॅड. बबन सरोदे, अ‍ॅड. सुभाष भोर, अ‍ॅड. समीर पटेल इत्यादींना निसर्ग रक्षा सैनिक म्हणून मानवंदना दिली जाणार आहे.

भारतासह जगभर सगळीकडे सिमेंटची जंगले तयार होत आहे. पेट्रोल, डिझेलवर चालणाऱ्या वाहनांची संख्या वाढत असून, ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न टोकाला गेला आहे. यातून सजीव सृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अहमदनगर वकील संघाने निसर्ग स्वातंत्र्य लढा जारी केला आहे. त्यातून न्यायालयाच्या आवारात प्रधान जिल्हा न्यायाधीश यार्लगड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करण्यात आलेली आहे. जिल्हा न्यायालय सिमेंटच्या जंगल स्वरूपात होते, त्याचे रूपांतर निसर्गरम्य अशा परिसरात झाले आहे. यंदाच्या जून महिन्यात जिल्हा न्यायालयाच्या समोरील बुऱ्हाणनगरकडे जाणाऱ्या बेलेश्वर चौकापर्यंत पाचशे झाडे लावण्याचा संकल्प निसर्ग रक्षा सैनिकांनी केला आहे.

वकील संघाच्या जाहीर कार्यक्रमात शेकडो निसर्गपाल वकील व निसर्गाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने लहान मुलांना बाल निसर्गपाल म्हणून शपथ दिली जाणार आहे.

या उपक्रमातून शहरातील हजारो निसर्गपाल व बाल निसर्गपाल सहभागी करुन घेण्यासाठी अहमदनगर वकील संघ प्रयत्नशील असल्याचे म्हंटले आहे.

# नि:स्वार्थ भावनेने रुग्ण व समाजसेवा करण्यात परिचारिकांचा मोलाचा वाटा

**प्राचार्या सौ. मलिका साबळे**

नगर – रुग्णसेवेमध्ये परिचारिकांचे स्थान अद्वितीय असून निस्वार्थ भावनेने समाजसेवा करण्यात परिचारिकांचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन बुथ हॉस्पिटल नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या सौ. मलिका साबळे यांनी जागतिक परिचारिका दिनानिमित्त प्रयत्न नर्सिंग कॉलेज, सावेडी, नगर येथे आयोजित कार्यक्रमात बोलतांना सांगितले.

प्रयत्न नर्सिंग कॉलेज, गुलमोहर रोड येथे परिचारिका दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते त्या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून बुथ हॉस्पिटल नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या सौ. मलिका साबळे, सिनियर ट्यूटर सौ.सुनिता पारखे उपस्थित होत्या.

सिनियर टयुटर सौ. सुनीता पारखे यांनी सुद्धा विद्यार्थांना मार्गदर्शन करताना आपल्या भाषणातून प्रत्येक कुटुंबामध्ये एक तरी नर्स असावी व आपण स्वतः नर्स असल्यामुळे या क्षेत्राविषयी अभिमान बाळगून या क्षेत्राचे व सेवेचे पावित्र्य जपण्याची मोठी जबाबदारी आपल्या खांद्यावर असून नर्सिंग आरोग्य सेवा व्यवसायाचे संपूर्ण तत्व निःस्वार्थ सेवेवर उभे आहे असे सांगितले.

तसेच प्रयत्न नर्सिंग कॉलेजच्या संचालिका डॉ. सौ. शितल म्हस्के व प्राचार्या सौ.दीक्षा घाटविसावे यांची प्रसंगी मार्गदर्शनवर भाषणे झाली. परिचारिका दिनानिमित्त महाविद्यालया अंतर्गत रांगोळी स्पर्धा व विविध नर्सिंग विषयांच्या उपक्रमांचे प्रदर्शन हे कार्यक्रम राबविण्यात आले होते. त्याचे पारितोषिक वितरण यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांबद्दल त्यांचा बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास नर्सिंग कॉलेजचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व नर्सिंग विद्यार्थी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

